
# देवाची शस्त्रसामग्री





## शिक्षक हस्तपुस्तिका
## सर्व वयोगटासाठी

# देवाची शस्त्रसामग्री

## सर्व वयोगटासाठी शिक्षक हस्तपुस्तिका




**"मुले महत्वपूर्ण आहेत" कडून रविवार शाळा कार्यक्रम**

**वेब: www.ChildrenAreImportant.com/armour/**

"मुले महत्वपूर्ण आहेत" च्या संपूर्ण समुहाचे आभारी आहोत!

संपादक: Kristina Krauss

क्रिएटिव्ह टीम: Abril Palacios Camacho, Areli Zuriel Salinas Sanchez, Dwight Krauss, Jacob Kuruvilla, Jennifer Sánchez Nieto, Julio Sánchez Nieto, Mike Kangas, Monserrat Duran Díaz, Rubén Darío, Suki Kangas, Verónica Toj, and Vickie Kangas.

Thanks to Rubén Darío for the wonderful music in this program.

अनुवाद कृतीसंघ: Ali Atuha, Aline Xavier, Annupama Wankhede, Anton Klymyk, Araz Mammadzadeh, Aroma Publications and Media, Arturo Jr Boron, Blessy Jacob, Carla Mayumi, Carmela Dawn Flores, Chrisbresnahan, David Raju, Ephraim Njuguna Mirobi, Finny Jacob, Geenav, HamidReza Azimi (hamid.azimi1364 at gm#ail com), Heyaudrey, I-clever.com, iqbalman, Jacob Kuruvilla, kamilturk, Karunguru Mwangi, kiran, Krauz1, Maitrayi Mondal, Marco Chu, Marcos Rocha, Mathew Das, Mitesh Mandaliya, mrramlama, Mrs.Geethashree NavaneethaKrishnan, Nassim Bougtaia, nicbenk, Paul Mwangi, Paul Septan, Rana922, Rubina Rai, Sabrina Benny John, Safdar Khan, shahroshan15, SubtitleMe, Talento-Unido, ueritom, Verdia Juliansyah Cancerika, Yeoh Jung Chin, and Zeina Mirella Barzaga Arencibia.

परिचय




भावांनो आणि बहिणींनो,

या क्षणी आम्ही तुम्हाला देवाच्या सैन्यांध्ये अधिकारी म्हणून पदोन्नती देत आहोत ! तुमच्या मंडळीतील सर्वांना या ‘‘देवाची शस्त्रसामग्री’’ साहित्यामध्ये सहभागी व्हावयास आवडेल. ते फार मजेशीर मिरवणूकीपासून / खेळाच्या दिवसापासून सुरूवात करू शकतात, ज्याची निर्मीती ग्वाटेमाला सिल्वीया डेलीओ, मरीओ व्हेलास्क्वेझ आणि त्यांच्या मदत करणा-या चमूने केली आहे. आणि मग मौज चालूच राहील, कारण सुकी कांगास यांनी लिहीलेलया नविन नाटक / लघुनाटीका करीत असतांना ते हसणे थांबवू शकणार नाहीत. चित्रफित संपादीत करीत असतांना जेनि सांचेझचे हसणे ऐकणे ही फारच गंमतीची गोष्ट आहे, जेथे सैनिक आधिकारी (माईक कांगास) आणि सैनिक गिगल (सुकी कांगास) आणि डूटी (फ्लोर बोल्डो) हे आनंदाने भूमिका निभावत आहेत. आणि जर सुकीचे नाटक तुम्हाला हसवत नसेल, तर तुम्ही पूर्ण पुडक्याची रचना पाहा. मला शिक्षकांच्या पुस्तकांचे आवरण फार आवडते, ज्यावर खूप गमतीदार आकृत्या आहेत, आणि सैन्याधिकारी सरळ पाहात आहे की या सर्व सैनिकांचे तो काय करणार आहे ! (बहूतेक तो तुमचा वर्गच असावा?)

माझी खात्री आहे की हा कार्यक्रम तुमच्या विद्यार्थ्यांना केवळ देवाची शस्त्रसामग्री पाठ करण्यास प्रेरित करील असे नाही पण ती जगण्यासाठी सुध्दा प्रेरित करील. लेकरांना खूप प्रेरणा मिळेल की त्यांनी सुकीच्चा नविन बिल्ल्यांपर्यत पोहंचावे आणि प्रत्येक शिक्षकांच्या खांद्यावर सुध्दा ते बिल्ले चकाकतील. लेकरांना हस्तकाम करण्यामध्येच केवळ मौज वाटेल असे नाही, परंतु शिक्षकांना सुध्दा यामध्ये सहभागी होण्यास आवडेल, कारण फ्लोर बोल्डो यांनी ते गोंडस बनविले आहे. मला माझ्या पवित्र शास्त्रासाठी बुकमार्क पाहिजे आहे! विद्यार्थ्यांची नविन पुस्तके फारच गोंडस आहेत, जे मोन्स डूरियन यांनी तयार केले आहेत, ज्यामध्ये नविन आकृत्या आणि नविन चित्र देण्यात आले आहेत जे कलाकार डग्लस 1985 यांनी तयार केले आहेत आणि असे वाटते की शिक्षकांना सुध्दा त्यांचे नविन चक्रव्यूह सोडविण्यास आवडेल!

परंतु हा कार्यक्रम केवळ मौजच नाही! पुस्तकाच्या प्रत्येक विभागात संदेश आहे, जे नविन धडे मी लिहीलेले आहेत त्यांच्यापासून, प्रश्न आणि उत्तरांचा सखोल विषय आणि सप्ताह मध्यंतरामध्ये करावयाचे गृहपाठ, जे विकी कंगास यांनी लिहीलेले आहेत. गीतांमधील सरळ संदेश सुध्दा आपण विसरू नयेत, जे सर्व मार्क कंगास यांनी लिहीले आहेत, आणि पुस्तकांच्या मागे देण्यात आलेले, फ्लोर बोल्डो यांचे व्हाट्स अप मधील आधुनिक संदेश सुध्दा विसरता येणार नाहीत.

संगिताबाबत बोलायचे झाले तर, मला त्यांचा उल्लेख करायचा आहे ज्या सर्वांनी माझ्यासोबत इंग्रजी आणि स्पॅनिशमध्ये गीते गायिली, यासाठी की शस्त्रसामग्रीची दहा गीते सुंदर, गंमतीदार आणि मजबूत संदेश देणारी होतील. ॲंडी कंगास, जेसिका मेशेल आणि आस्टीन मेशेलला इंग्रजीमध्ये सी डी तयार करण्यासाठी मला मदत केलयाबद्दल आणि माईक कंगास आणि फ्लोर बोल्डो यांनी माझ्यासोबत स्पॅनिश मध्ये गीत गायिल्याबद्दल फार धन्यवाद. परंतु सुकीने, आपल्या सर्जनशील कृतिकडून गीतांमध्ये आणखी जीवंतपणा आणला आणि मला जे जास्त आवडतं ते हे कि जेव्हा पूर्ण चमू डेविड, ज्युलीओ, इलोर, मोन्स, जेनि आणि सुकीसोबत एकत्र येतात.


तसे पाहिले तर, हे एक चमूचे कार्य आहे, सुरूवातीच्या प्रार्थनेपासून तर, ज्युलिओ सांचेझ यांनी मेक्सिको आणि ग्वाटेमाला येथे विक्रीसाठी पुस्तके छापण्यास दिली आणि माईक कंगास सर्व भाषा संकेत स्थळावर टाकेपर्यंत, यासाठी की तुम्ही ते मोफत उतरवू शकता. आणि मला व्हेरोनिका तोज, ग्वाटेमाला, जी फेसबूकची प्रभारी आहे आणि ब्लेसी जेकब, जी भारतामध्ये भाषांतराची प्रभारी आहे ह्यांचे आभार मानावेसे वाटतात. आणि सर्वकाही संपादीत करण्यासाठी मदत केल्याबद्दल फ्लोर बोल्डोला पुष्कळ धन्यवाद! चमू, तुमचे अभिनंदन, तुमचे प्रेम, सर्जनशीलता आणि सेवेद्वारे कार्यक्रमात सुधारणा केली म्हणून. तुमच्या शिवाय, मी काहीहि पुर्ण करू शकले नसते. यूध्दभूमिच्या आघाडीवर असलेल्या सर्व शिक्षकांचे सुध्दा आभार, जे हे वर्ग शिकवितील आणि जगामध्ये फरक घडवून आणतील. आम्हाला असे वाटत नाही की ही पुस्तके धूळ खात पडून राहावीत, परंतु याद्वारे पुढील पिढी प्रशिक्षीत व्हावी.शिक्षकांनो, तुमच्याशिवाय, आमची चमू काहीच करीत नाही. लेकरांवरील तूमची प्रीती, तूमचे समर्पण आणि धीराकडून तूम्ही आम्हाला जे आत्मिक फळ देता त्यासाठी आभारी आहे. तुम्हातील प्रत्येकाला देव दुप्पट आशीर्वाद देवो !

Kristina Krauss

मुले महत्वपूर्ण आहेत

# हे साहित्य कसे वापरावे

## वैशिष्टे




या कार्यक्रमाबाबत काही फार छान असेल तर चिन्हे आणि बिल्ले जे लेकरे आणि शिक्षक मिळवू शकतात.प्रत्येक वर्ग सुरू करण्याआधी, तुम्हाला एक छोटासा पुरस्कार सोहळा आयोजित करून बिल्ले वितरीत करता येतील.(जर तुम्ही वर्गापूर्वी तुमची तयारी पूर्ण करू शकला नाही, तर गीते गात असतांना तुम्ही तुमची तयारी पूर्ण करू शकता). प्रत्येक आठवडयात जिंकण्यासाठी चार बिल्ले आहेत. नंतर जेव्हा लेकरे येतात, गृहपाठाची टिपण काढा: प्रेषितांच्या कृत्यांमधील अध्याय वाचा आणि ''बुटकॅम्प'' गृहपाठ, ज्यामध्ये त्यांना आठवडयामध्ये काहीतरी करावयाचे आहे.तसेच त्यांची आठवडयातील उपस्थिती लिहून ठेवा, पाठ केलेली वचने म्हणून दाखविण्यास सांगा (आपण देवाची शस्त्रसामग्री शिकणार आहोत), यासाठी की ते सुध्दा पाठांतर तारे मिळवू शकतील. कोणी काय मिळविले हे चांगल्या प्रकारे लिहून ठेवा आणि प्रत्येक आठवडयात छोटया संमारंभामध्ये वाटण्यासाठी चिन्हे तयार ठेवा.

- वर्ग उपस्थिती
- जीवन गुहपाठ
- वाचन करावयाचा गृहपाठ
- शस्त्रसामग्री वचने पाठांतर

पुस्तकाच्या शेवटी असलेल्या कागदाचा वापर त्यांनी कमावलेल्या चिन्हांचा उल्लेख करण्यासाठी तुम्ही करू शकता.

### हजेरी

प्रत्येक लेकराला प्रत्येक वर्गामध्ये हजर राहिल्याबद्दल मुख्य बिल्ला मिळतो. तुम्ही प्रत्येक लेकराला दोन्ही हातांवर लावण्यासाठी 2 बिल्ले देऊ शकता किंवा एका हातावर लावण्यासाठी एक बिल्ला देऊ शकता.






अंशिक मदत किंवा केवळ काही दिवस आल्याची उदाहरणे. पट्टे एकत्र ठेवा.



वाचन आणि पाठांतर





लेकरे, प्रत्येक धड्यासाठी नेमून देण्यात आलेला प्रेषितांची कृत्येमधील भाग वाचून, तारा मिळवू शकतात, तसेच दिवसासाठी असलेले वचन पाठ करून सुध्दा तारा मिळवू शकतात. जर त्यांनी पूर्ण प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक वाचले आणि 10 वचने पाठ केली तर त्यांचे बिल्ले भरून जातील. हा बिल्ला लेकरांच्या उजव्या बाजूला ठेवा (जर त्यांनी पहिले 9 आठवडे मिळविले तर त्यांना 10 वा आठवडा मिळेल).



बुटकॅम्प / जीवन नेमून दिलेली कामगिरी

प्रत्येक धड्यामध्ये, आठवड्यामध्ये, धडा आचरणात उतरविण्यासाठी, नेमून दिलेली कामगिरी आहे. प्रत्येक पूर्ण केलेल्या कामासाठी 'रिबन'' (कागदी त्रिकोण). त्रिकोणाला धागा, टेप आणि त्यांना थोड्याशा कागदाने डिंकाने जोडा. त्याला लेकरांच्या डाव्या बाजूला लावा.




वेळापत्रक (1.30 तास)

**वर्गाआधी (10 मिनीटे):**

- जेव्हा लेकरे येतात, त्यांनी मिळविलेल्या यशाची नोंद ठेवा, यासाठी की ते प्रत्येक आठवडयात 4 बिल्ले मिळवू शकतील.
    - वर्ग उपस्थिती
    - जीवन नेमून दिलेली कामगिरी / बुटकॅम्प
    - गृहकामाचे वाचन: प्रेषितांची कृत्ये
    - शस्त्रसामग्री वचने पाठ करणे

**(25 मिनीटे) सुरूवात:**

कृतिपर गीते

- पुरस्कार कार्यक्रम / चिन्हे
- धड्याचा मथळा

- नाटक / रेखाचित्र




### (15 मिनीटे) धडा:

- मुख्य धडा
- पाठांतर वचन

### (20 मिनीटे) विद्यार्थी पुस्तके:

- कोडे आणि कार्यानुभव
- पवार पॉइंट/ चर्चा
- प्रश्न / चर्चा
- जीवन आणि वाचन गृहपाठ नेमून द्या.

### (20 मिनीटे) कार्यानुभव:

खेळ

हस्तकला

नाटके

प्रत्येक आठवडयामध्ये सैन्याधिकारी दोन शिपायांना बुटकॅम्प मध्ये, देवाच्या शस्त्रसामग्रीबाबत शिकवितो. प्रत्येक नाटकामध्ये नविन सैनिक विद्यार्थ्यांकरिता, शब्बाथ शाळेत शिकविण्यात आलेल्या धड्यासारखा धडा शिकतो.



पात्र:

- सैनिक गिगल

नेहमीच गोंधळ करतो आणि शस्त्रसामग्रीचे तुकडे विसरतो.

- सैनिक डयूटी

सूचनांचे पालन करण्यामध्ये चांगला.

- अधिकारी अपराईट

दोन सैनिकांना प्रशिक्षण करण्यासाठी प्रभारी

या साहित्यासाठी आमच्याकडे या नाटीका डी व्ही डी वर किंवा यू टयूबवर आहेत. नाटकात भाग घेणा-यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून तुम्ही व्हिडीओ वापरू शकता किंवा ती चित्रफित तुम्ही लेकरांना दाखवू शकता. या नाटकाच्या चित्रफिता खरी भाषा वापरत नाहीत आणि तुमच्या विभागात कोणतीहि भाषा बोलली जात असली तरी त्यांचा उपयोग होईल. तुमच्या यू टयूब वाहिनीवर नाटक पाहा.

www.youtube.com/c/Childrenareimportant

## पुठ्ठयाची शस्त्रसामग्री आणि साधा रचना आराखडा

आपल्या नाटकासाठी आपण पुठ्ठयाची पेटी, रिबन आणि कॅलेंडर्स / भांडे वापरून कमी खर्चाची शस्त्रसामग्री तयार करतो. लांब फूग्यांपासून पेहराव कसा तयार करावा आणि इतर संकल्पनांबाबत सूचना पाहा.





**तारणाचे शिरस्त्राण**

ताण देणारी मशिन किंवा भांडे

रिबन

डोक्यावर मऊ करण्यासाठी टावेल.







नीतीमत्वाचे उरस्त्राण

पुठयाची मोठी पेटी

रिबन आणि डिंक / अधातूरूप मुलद्रव्य

शिवल्यामुळे पुठ्ठा दुभागलेल्या ठिकाणी मजबूत होतो .









विश्वासाची ढाल

मोठया पेटीची एक बाजू

पारदर्शक प्लास्टीक पिशवी


अधातूरूप मुलद्रव्याचा डिंक

पिरगळलेली रिबन / रश्शी


प्रार्थना आणि बोलण्याचे साधन: 1

लहान पेटी

पेटी दुमडण्यासाठी तारेचा तुकडा







सत्याचा कमरबंद

तुमच्या पट्टयावर तुम्ही उपयुक्त साधने लावू शकता, जसे की गोफण, रश्शी, आणि पेटी.





तुकडे

प्रत्येक तुकडयाला पुठ्ठयाचा तुकडा आणि सिलीकोन / डिंकाची गरज असते..











**गोफण**




**रश्शी**







**दुर्बिण**




खर्ड्याच्या खोक्या प्रमाणे तळ बंद करा.

## पेटी

2 कागदी थाळया आणि टायलेट पेपरची पुंगळी वापरून ही पेटी कशी तयार करावी हे समजण्यासाठी आणखी जास्त संकल्पना असलेला विभाग पाहा.









हे तुकडे सामान्य पट्ट्यावर टाका

सिनीओग्राफी
दहा नाटकांसाठी:
शिडी
पुठ्ठयाचे दोन बॉक्स
मेज
पाण्याचे भांडे
कागदाचे छोटे तुकडे



अतिरीक्त कल्पना


**फुग्यांचा लहानसा मनोरा**



तपकिरी, हिरवे, काळे आणि पांढरे फूगे वापरून दोन मनोरे किवा स्तंभ करण्याबाबत कसे वाटते ?

आपण चार रंगांचा एक लहान स्तंभ तयार करू. दोन जोडया तयार करा (2 बांधलेले फूगे). काळा फुगा आणि एक हिरवा फूगा आणि दुसरा स्तंभ 1 पांढरा आणि एक तपकिरी फूगा वापरून.टीप: लक्षात ठेवा की तोंडाजवळ चांगले बांधा यासाठी की तुम्हाला त्यांचा वापर चांगल्याप्रकारे करता यावा. आता जोडया दुमडा आणि एकत्र मूडपा. ही प्रक्रिया 8  वेळा करा म्हणजे चार फूग्यांच्या 9 रांगा तयार होतील.

पहिले 4 फूगे x या आकारात ठेवा, हिरवा फूगा संदर्भ म्हणून ठेवा. आता चार फूग्यांची एक एक रांग + आकारात लावा, त्यांना पहिल्या कुरळया रिबनने चार फूग्यांसोबत जोडा यासाठी की ते हलणार नाहीत. असेच पुढील चार फूग्यांबाबत करा, प्रत्येक वेळी त्यांना x, +, x, + इत्यादी प्रकारे फिरवा.





टीप: तुमच्या लहान मनो-याच्या वर तुम्ही मेटॅलीक तारा फूगा ठेवू शकता, त्यामुळे त्याला अंतिम स्वरूप मिळेल. आमच्याकडे फूग्यांचा लहानसा मनोरा कसा तयार करावा याबाबत चित्रफित उपलब्ध आहे.

https://youtu.be/hut9db-AL0I

किंवा आमच्या यू टयूब चॅनलवर शोधा:

http://youtube.com/c/Childrenareimportant

**चिन्ह कागदाने सजवा**



तुम्हाला पत्राच्या आकाराचे हिरवे, तपकिरी, राखाडी, काळया रंगाचे कागद, कैची, पेन्सिल, मापपट्टी आणि रश्शीची गरज पडेल.

आपण त्रिकोणी आकाराचा नमूना करणार आहोत. तुमचा कागद क्षितीजासारखा ठेवा, पत्राच्या आकाराचा कागद अर्धा मूडपा, कागद कापा आणि दुमडण्यासाठी केवळ अर्धा कागद वापरा, पट्टीने कागदाची रूंदी मोजा आणि मध्यभागी खूण करा. उदाहरणार्थ, जर तुम्ही 14 सेमी मोजले तर तूमची खूण 7 सेंमी वर करा. आता बिंदूपासून डाव्या बाजूच्या वरपर्यंत एक रेघ मारा. आता त्या बिंदूपासून वरील डाव्या कोप-यापर्यंत रेघ ओढा आणि असेच उजव्या बाजूबाबतहि करा. आता केवळ त्रिकोण आकार दिसेल. जास्तीचा कागद कापा आणि आता तुमच्याकडे नमूना उरलेला असेल. एकदा तुम्ही रंगीत कागदावर अनेक त्रिकोण तयार केले की तुम्ही त्यांना विखरू शकता.

आता त्रिकोण रश्शीवर चिटकवा.एक दुस-यांमध्ये अंतर ठेवू नका.




**पुठ्ठयाचे खोके**

वेगवेगळया आकाराचे पुठ्ठयाचे खोके घ्या, पर्मनंट मार्कर, हस्तकला कागद, किंवा खाकी कागद आणि टेप घ्या.कागदी खोक्यांना कागद लावा. खोक्यांना सुशोभित करा - रेघा मारून किंवा ''तारणाचे शिरस्त्राण किंवा ''सुवार्तेच्या वाहणा'' असे लिहा आणि असे बरेचसे खोके एकावर एक ठेवून वर्ग सजवा.




**पॅराशूट सैनिक**

तूम्हाला प्लास्टीक सैनिक, कॉफी गाळण्यासाठी चाळणी, पुठठे, टेप, रिबन किंवा दोरी लागेल. कॉफीची चाळणी चूरगळलेल्या रिबनने प्लास्टीकच्या शिपायाला जोडा. चाळणीच्या वरील भागी लटकवण्यासाठी तुम्ही टेपची आणखी एक पट्टी लावू शकता आणि तिला तुमच्या बैठक खोलीत लावा किंवा जेथे तुम्हाला सुशोभीत करावयाचे आहे तेथे लावा. पारंपारीक ''शस्त्रा'' ऐवजी, हे सैनिक वेगळे शब्द धारण करतात जे या कार्याक्रमातील धडयांमध्ये वापरले आहेत, विश्वास, सत्य, शांती, तारण इत्यादी.




**कागदी थाळया आणि टयूबचा डब्बा**

दोन कागदी ताट किंवा पुठ्ठयाचे अंदाजे 10 सेमीचे गोलाकार, डिंक, कातर, तपकिरी आणि हिरवा रंग किंवा हिरव्या आणि तपकिरी रंगाचे कापलेले तुकडे, सॅनिटरी पेपरची पुंगळी(दोन लेकरांसाठी एक पुंगळी पुरेशी आहे).किंवा तुम्ही कोणत्याहि थंड पेयाची प्लास्टीक बाटली आणि चूरगळलेली रिबन वापरू शकता.

**सुचनाः** दोन्ही ताटांवर कागदाच्या टयूबच्या आकाराएवढा यू आकार काढा, हे निश्चीत करा की आकार सारखे आहेत, आणि ते कापा. कागदाची पूंगळी ताटावर चिटकवा, जेथे यू आकारामध्ये कापण्यात आले आहे. दुसरी ताट बरोबर वर ठेवा आणि दोन्ही कागदी ताटे चिटकवा.

तुम्ही याला दोन प्रकारे सुशोभीत करू शकता. एक पर्याय आहे तपकिरी आणि हिरवा रंग. दुसरा पर्याय तपकिरी आणि हिरव्या रंगाचे विवीध आकार कापा आणि मग त्यांना ताटांच्या किनारीवर चिटकवा. प्रत्येक बाजूला एक लहानसे छिद्र करा आणि चूरगळलेली रिबन किंवा दोरी बांधा.

## उपलब्ध साहित्य




**शिक्षकांचे पुस्तक.**

सर्व वयोगटांसाठी 10 धडे.

**विद्यार्थ्यांचे पुस्तक**


सोपे - वय 4-6

मध्यम - वय 7 - 9

कठीण - वय 10-12

प्रगत - 13 +






**तक्ते आणि फ्लायर**

जास्त लेकरांना आमंत्रण  द्या.




**चिन्हे / प्राविण्ये**

- वर्ग हजेरी
- आठवडयातील जीवन गृहपाठ
- वाचन गृहपाठ, प्रेषितांची कृत्ये
- पाठांतर: देवाच्या शस्त्रसामग्रीची वचने

**प्रमाणपत्र**

प्रत्येक लेकराला

कार्यक्रमाच्या शेवटी द्या.




**हस्तकला** तुमच्या वर्गातील कामांना पूरक अशा 2 हस्तकला




## कृतिपर गीते

प्रत्येक दहा धडयांसाठी मूळ गीते.




नाटके

१० धड्यांसाठी अतिशय विनोदी नाटके( शब्दहीन/ भाषे विना)








सोशल मीडीया


हे सर्व साहित्य आमच्या संकेत स्थळावरून उतरवून घ्या, शिक्षक आणि पुढा-यांची साहित्य सुध्दा उतरवून घेऊ शकता.

संकेत स्थळ

हे सर्व साहित्य आमच्या संकेत स्थळावरून उतरवून घ्या, शिक्षक आणि पुढा-यांची साहित्य सुध्दा उतरवून घेऊ शकता.




हे साहित्य कसे छापावे:



# धडा 1


शिर्षक – धडा 1

अदृश्य जग

पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 1

येशू स्वर्गात जातो

प्रेषित 1:1-11




चिन्हे – धडा 1

प्रत्येक लेकराला 2 चिन्हे लावण्यासाठी पृष्टभाग मिळतो, एक उपस्थितीसाठी आणि दुसरा वाचन आणि पाठांतरासाठी

उपस्थितीसाठी आजचे चिन्ह:



पुढील आठवडयापासून विद्यार्थी वाचन, पाठांतर आणि दिलेला गृहपाठ पूर्ण करण्यासाठी पारितोषिक मिळवू शकतील.

नाटक – धडा 1

सैनिक गिगल आणि सैनिक डयुटी सैन्यामध्ये दाखल होतात. सैनिक गिगलची खात्री असते की शत्रू नाही आणि त्याला केवळ आकर्षक पेहराव घालावा, बलवंत व्हावे आणि चित्रपटासारखे दिसावे असे वाटते. अधिकारी अपराईट प्राथमिक आगेकूच कवायतीची पाहणी करतात आणि शत्रूसोबत लढण्याबाबत भाषण देतात.

पाठांतर वचन – धडा 1

" शेवटी, माझ्या बंधूंनो, प्रभूमध्ये व त्याच्या प्रभावी सामर्थ्यात बलवान होत जा. सैतानाच्या डावपेचांपुढे तुम्हांला टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री धारण करा."

इफिसकरांस पत्र 6:10-11

मुख्य धडा – धडा 1

**प्रेषित 1:1-11**

आपल्या आजूबाजूला अदृश्य जग आहे आणि ते अतिशय खरे आहे, जरी आपण ते पाहू शकत नाही तरी. जसे तूम्ही वारा पाहू शकत नाही, परंतु तुम्ही पाहू शकता की वारा झाडांच्या पाणांमधून वाहिला म्हणजे झाडे कसे हालतात, अगदी तसेच आध्यात्मिक जगाचे आहे. जुन्या करारातील एक संदेष्टा, अलिशा, अदृश्य जग पाहण्याबाबत अतिशय चांगले उदाहरण देतो. अराम आणि इस्त्राएलांमध्ये युध्द होण्याच्या बेतात आहे.(1 राजे 6:8-23). एके रात्री, शत्रूच्या सैन्याने शहराला वेढा दिला आणि जेव्हा अलिशाचा सेवक त्यांना पाहातो तेव्हा त्याला फार भिती वाटते. परंतू सेदंष्टयाने आपल्या सेवकाला सांगितले की त्याने घाबरू नये कारण त्यांच्यासोबत असलेले सैन्य शत्रुसोबत असलेल्या सैन्यांपेक्षा जास्त आहेत. मग अलिशाने त्याच्या सेवकाचे डोळे उघडावे म्हणून प्रार्थना केली आणि त्याने डोंगराकडे पाहिले जो घोडे आणि अग्निरथांनी भरून गेला होता. देवाने आपल्या लोकांचे सरंक्षण करण्यासाठी फार मोठे अदृश्य सैन्य आणले होते.

आपल्या अवतीभोवती आध्यात्मिक युध्द सुरू आहे, जरी आपण ते पाहू शकत नाही. पवित्र शास्त्र सांगते की सैतान अस्तित्वात आहे आणि त्याला असे वाटते की आपण आत्मिक राज्याकडे दुर्लक्ष करावे. प्रेषितांच्या कृत्यांमधील आजच्या गोष्टीमध्ये येशू स्वर्गामध्ये घेतला जातो. मजवर विश्वास ठेवा, स्वर्ग आणि नरक खरे आहेत. या सत्य ऐतिहासिक वृतांतामध्ये, येशू स्वर्गामध्ये गेल्यानंतर, दोन देवदूत शिष्यांसमोर येतात! देवदूत आपल्याला मदत करतात किंवा सैतान आपल्यावर हल्ला करतो याची कल्पना करणे आपल्यासाठी कठीण आहे, परंतू आपण ज्या गोष्टी पाहातो त्यापेक्षा या गोष्टी जास्त ख-या आहेत. देवाच्या शस्त्रसामग्रीकडे उडी मारू या आणि या अदृश्य जगाबाबत आणखी शिकू या. आपल्याला आवडो अथवा न आवडो आपण  लढाईमध्ये सहभागी आहोत. म्हणून देवाची संपूर्ण शस्त्रसामग्री धारण करू या.

बुट कॅम्प– धडा 1

नेमून दिलेले काम– धडा 1

तुमचे स्वतःचे असे चित्र काढा की तुम्हाला देवदूत कोणत्याहि प्रकारे मदत करीत आहे. काही धोक्याच्या जागा किंवा भयप्रद परिस्थितीचा विचार करा.

गृहपाठ (मोठे विद्यार्थी) – धडा 1

4 प्रेषित 1- 4 वाचा

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 1

''मी या अदृश्य जगावर विश्वास ठेवतो आणि देवाची शस्त्रसामग्री धारण करतो.''

प्रश्न आणि उत्तरे – धडा 1


1.चांगले आणि वाईट अदृश्य जग अस्तित्वात आहे याचा कोणता पुरावा तुम्ही पाहिला आहे? तुमच्या विद्यार्थ्यांना उत्तेजन द्या की त्यांनी अशा लोकांच्या गोष्टी सांगाव्या ज्यांना अपघातात किंवा आजारांमुळे वाईटरीतीने ईजा होऊ शकली असती परंतु कायमस्वरूपी हानी होण्यापासून ते वाचले. स्वप्न आणि अंतस्थ प्रेरणा कधीकधी आपल्याला चांगला निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन करतात, जे निर्णय आपण बाहेरील मदतीशिवाय आपणहून घेऊ शकलो नसतो. कधीकधी आपण भितीने भरून जातो जरी तसे का होत आहे हे आपल्याला समजत नाही आणि आपण सैतानाला सांगू शकतो की माझ्या वाटयाला जावू नको आणि आपल्याला पुन्हा शांती मिळते.
2.तुम्ही इतरांना पाहिले आहे का ज्यांनी चूका केल्या आणि ज्यांचे देवाच्या शस्त्रसामग्रीने संरक्षण झाले नाही! काही गोष्टी सांगा. कल्पना अशी आहे की विद्यार्थ्यांनी पाहिलेले अनूभव सांगावे आणि त्यांना समजावे की देवाची शस्त्रसामग्री धारण केली नाही तर चूका किंवा पाप करणे सोपे असते. खरी नावे वापरू नका ! विद्यार्थ्यांना अशा लोकांबाबत सांगण्यास सांगा जे त्यांना माहित आहेत की पूर्वी ते येशूवर प्रेम करीत असत आणि चर्चला जात असत, परंतू आता तसे करीत नाहीत.
3.आपल्या आजूबाजूचे आत्मिक युध्द कसे आहे असे तुम्हाला वाटते?
पवित्र शास्त्रामधील देवदूत आणि अशूध्द आत्म्यांबाबतच्या उदाहरणांबाबत बोला.(उदाहरणार्थ दानिएल 7, 9:21-23, 10:5-14).
4.येशू जसा गेला तसाच पुन्हा येईल हे वचन कोणी दिले?
(शुभ्र वस्त्रे परिधान केलेल्या दोन पुरुषांनी, संभवतः देवदूत).
5.प्रेषित 1:8 मधून गाळलेल्या जागा भरा. ''आणि ..............................................................तुम्ही माझे साक्षी व्हाल .''
(यरुशलेम, सर्व यहूदीयात, शोमरोनात आणि पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.'' आपण साक्ष दिली पाहिजे, जेथे कुठे आपण जातो तेथे आपण लोकांना येशूबाबत सांगितले पाहिजे).

खेळ : क्रांती – धडा 1

साहित्य

कागद, पेन, फूगे आणि संगित (ऐच्छिक)

तयारी



कागदाच्या तुकडयांवर पुढील 9 धडयांची नावे लिहा. फूगे चपटे करा आणि बंद करण्यापूर्वी त्यामध्ये धड्याची नावे टाका.

खेळ खेळणे

1.विद्यार्थी वर्तूळ तयार करतील आणि 1 फूगा वर्तूळात फिरवितील. (पहिला विद्यार्थी फूगा डोक्यावरून दुस-याला देईल, दुसरा पायाच्या मधून देईल, इत्यादि) जोवर शिक्षक जोराने ओरडत नाहीत किंवा शिट्टी वाजवित नाहीत. (पर्याय: विद्यार्थी एकमेकांना फुगे देत असतांना आनंद संगित वाजवा).

2.जेव्हा शिक्षक ओरडतात, तेव्हा ज्या विद्यार्थ्याच्या हातात फूगा असेल तो मध्यभागी येईल आणि फूग्यावर एक पाय देवून फूगा फोडेल. नंतर विद्यार्थी फूग्यातील कागद सर्वांना वाचून दाखविल. फूगे संपेपर्यत खेळ चालू राहिल.

पर्याय


1.जर विद्यार्थी जास्त असतील, तर तुम्ही जास्त वर्तूळ करावेत किंवा एकापेक्षा जास्त फूगे एक दुस-याला द्यावेत.

2.कागदांवर धड्याची नावे लिहीण्याव्यतिरिक्त तुम्ही फूग्यामध्ये गोळी टाकू शकता किंवा वेगवेगळया सूचना लिहू शकता (जसे की चर्च भोवती एक फेरी मारा, इत्यादि).

कोडयाची उत्तरे – धडा 1

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पि | क | शू | स्रि | जी | णी | प्रे | मे | घ |
| ता | बा | ले | क | ज्य | वं | षि | जी | शू |
| प्रे | घ | स्रि | जी | ये | शू | त | ले | वा |
| क | शू | य | स्मा | प्रे | ले | जी | क | षि |
| पा | णी | रू | क | दि | घ | शि | शू | प्रे |
| क | जी | श | षि | शू | ला | दि | ले | णी |
| घ | प्रे | ले | र्ध्य | प्रे | क | जी | व | स्रि |
| स्रि | शू | म | क | आ | त्मा | घ | प्रे | स |
| जी | मा | क्षी | रा | णी | प्रे | शू | स्व | क |
| प्रे | क | शू | ज्य | व | घ | षि | र्ग | जी |





# धडा 2


## शिर्षक – धडा 2

अंधाराविरुद्ध लढा

## पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 2

बंदिशाळेमध्ये पौल आणि सीला
प्रेषित 16:16-31

## चिन्हे – धडा 2



आजचे उपस्थितीचे चिन्ह :
ज्या प्रत्येक विद्यार्थ्याने मागील आठवडयामधील ‘‘बुट कॅम्पमध्ये सांगितलेले काम केले त्यांना ही रिबन मिळेल.





ज्या सर्व विद्यार्थ्यांनी मागील आठवडयातील सांगण्यात आलेले वाचन पूर्ण केले त्यांना तारा मिळेल.

जो विद्यार्थी मागील आठवडयातील पाठांतर वचन म्हणून दाखविल त्याला तारा मिळेल.

## नाटक – धडा 2

सैनिक डयुटी आणि गिगल एकमेकांसोबत वाद करीत प्रवेश करतात. सैन्याधिकारी अपराईट सैनिक गिगल आणि सैनिक डयुटी यांना अडखळणाचा अभ्यासक्रम करण्यासाठी सांगतात आणि अभ्यासक्रम करीत असतांना ते एकमेकांना टोमणे मारतात. अडथळयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, सैनिक पुन्हा भांडू लागतात. सैन्याधिकारी भांडण सोडवितात आणि सांगतात की त्यांचे झगडणे एकमेकांविरुद्ध नाही तर शत्रूविरुद्ध आहे.

## पाठांतर वचन – धडा 2

"कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्यांबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे.." इफिसकरांस पत्र 6:12.

## मुख्य धडा – धडा 2


**प्रेषित 16:16-31**

आपण मानवांसोबत झगडत नाही तर सैतान आणि त्याच्या अंधकारातील दुरात्या समूहासोबत लढतो. सैतानाला गैरसमज पसरावयास आवडते आणि तो लोकांचा एकमेकांना दुखविण्यासाठी वापर करतो, परंतू आपण लक्षात ठेवावे की आपले युध्द हे नेहमी सैतानाविरुद्ध आहे! आपले जग पतित आहे आणि मानव म्हणून आपण एकमेकांविरुद्ध पाप करितो. परंतु आपण एकमेकांविरुद्ध लढू नये हे लक्षात ठेवले पाहिजे, कारण तसे करणे म्हणजे शत्रुच्या सापळयात अडकण्यासारखे होईल. देव सर्वांवर प्रेम करतो, जरी आपण चूका करतो तरी. जेव्हा आपण चूका करतो तेव्हा, आपल्या जीवनावर असलेल्या देवाच्या दयेसाठी आपण कृतज्ञ आहोत, तर मग आपणहि दुस-यांवर दया केली पाहिजे. कधीकधी शत्रू आपले शब्द किंवा कृति फिरवतो, परिणामी आपण एकमेकांवर फार रागावतो. असे असले तरी, देव सर्वांवर प्रेम करतो आणि आपणहि सर्वांवर प्रेम केले पाहिजे.

आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीमध्ये, पौल आणि सीला यांना बंदिशाळेत टाकण्यात आले आहे. पहारेकरी त्यांच्यासोबत क्रूरतेने वागतात, जरी त्यांनी काहीहि चूक केलेली नाही. असे असले तरी, देव त्यांना सुटकेचा मार्ग देतो. ते पहारेक-याचा सूड उगवित नाहीत, त्या उलट ते त्याच्यावर दया करतात, त्याला आणि त्याच्या कुटुंबाला ते प्रभूकडे आणतात! पौल आणि सीला, पहारेक-याने त्यांना वाईटरीतीने वागविले म्हणून, त्याला दोष देऊ शकले असते, परंतू त्यांनी लक्षात ठेवले की त्यांचे युध्द सैतान आणि त्याच्या दुरात्मा समूहासोबत आहे. आपण देवाची शस्त्रसामग्री धारण करीत असतांना आपण लक्षात ठेवावे की आपल्याला आकाशातील दुरात्या समूहासोबत लढायचे आहे, सोबतीच्या मानवांसोबत नाही !

बुट कॅम्प– धडा 2

नेमून दिलेले काम– धडा 2



तूमच्या अवतीभोवती असलेल्या लोकांची कृति आणि शब्द याबाबत सतर्क असा आणि आत्मिक हल्ला ओळखून घ्या. जेव्हा तूम्ही पाहाता की कोणीतरी दूस-याला वाईटरीतीने वागवत आहे, तेव्हा ओळखा की सैतानाला किती आनंद होत आहे आणि देव किती दुःखी असेल. काय झाले ते आपल्या शिक्षकांना सांगण्याची तयारी ठेवा, पण कोणाचे नाव घेऊ नका.

गृहपाठ (मोठी मुले) – धडा 2

प्रेषित 5-7 वाचा

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 2

''मी शत्रुविरुद्ध लढण्याचा निर्णय घेतला आहे, माझ्या सभोवती असलेल्या लोकांसोबत नाही.''

प्रश्न आणि उत्तरे – धडा 2

1.या शब्दांचा अर्थ काय? सत्ता, अधिकार, या अंधकारमय जगाचे अधिपती आणि आकाशातला दुरात्मा समूह. इफिस 6:12 . कल्पना ही आहे की विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावे की आपण युध्दात आहोत आणि सैतान आणि त्याचे दूत हे खरे आहेत, जरी आपण त्यांना पाहू शकत नाही.1 पेत्र 5:8, प्रकटी 12:9.

2.आपण अंधकारमय जगासोबत झगडण्याऐवजी मनुष्यांसोबत झगडलो याची कोणती उदाहरणे आहेत? उदाहरण: जेव्हा तुम्ही शास्त्र वाचता किंवा संदेश देता तेव्हा कोणीतरी तुमची गंमत करते. जेव्हा आपल्याकडे मानवी वृत्ती असते, पण लोकांना वाटते की आपण मूर्ख आहोत. विद्यार्थ्यांनी उदाहरणे द्यावी म्हणून त्यांना मूभा द्या.


3.आपल्याला देवाच्या शस्त्रसामग्रीबाबत माहिती असावी असे देवाला का वाटले?

त्याची अशी इच्छा आहे की आपल्याला हे माहित असावे की, तो नेहमी आपल्यासोबत आहे आणि या जगात आपण एकटयानेच मजबूत असे उभे राहावे असे त्याला वाटत नाही. तो आपल्याला सांगतो की ''देवाची शस्त्रसामग्री धारण करा .'' कारण एकतर आपण त्याची मदत घेऊ किंवा त्याची मदत नाकारू आणि सर्वकाही आपल्याच शक्तीने करण्याचा प्रयत्न करू.

4.तुरूंगात टाकण्यापूर्वी, पौल आणि सीला यांचेबाबत कोणती दुःखदायी गोष्ट घडली? त्यांना लोकांसमोर छडीने मारहाण करण्यात आली. प्रेषित 16:22-23, 37.

5.''माझे तारण व्हावे म्हणून मी काय केले पाहिजे?'' या बंदिशाळेच्या नायकाच्या प्रश्नाचे उत्तर काय होते ? त्यांनी त्याला सांगितले, ''प्रभू येशूवर विश्वास ठेव, म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल.'' प्रेषित 16:31.

खेळ : युध्द – धडा 2



**साहित्य**

6 विद्यार्थ्यांच्या प्रत्येक गटासाठी धाग्याचा लहान बंडल.

**खेळ खेळणे**

1.लेकरांचा 4 ते 6 जणांचा गट तयार करा आणि त्यांना ओळीमध्ये उभे करा, दोन गटामध्ये बरेच अंतर ठेवा.

2.विद्यार्थ्यांसोबत चर्चा करा की कधीकधी सैतान आपल्याला बांधण्यासाठी लोकांचा वापर करतो, परंतू काहीहि झाले तरी शेवटी आपण सैतानासोबतच झगडत आहोत. या खेळामध्ये, आपणच आहोत की जे स्वतःला बांधतो, परंतु आपली सूटका करण्यासाठी, आपल्याला धागा काढावा लागेले आणि काळजी घ्यावी लागेल की आपण दुस-यांसोबत भांडू नये.

3.प्रत्येक ओळीतील पहिल्या विद्यार्थ्या कडे धाग्याचा लहान चेंडू द्या. पहिला विद्यार्थी धाग्याच्या चेंडूची सुरूवात आपल्या हातात घेतो आणि चेंडू शेवटपर्यंत जाईपर्यंत ओळीतील इतर मुलांकडे देतो. शेवटचा विद्यार्थी तो चेंडू पुन्हा समोर देतो .

4.चमूने दो-याचा चेंडू संपविल्यावर, त्यांचे काम आहे की, शत्रुच्या सापळयातून स्वतःची सूटका करावी आणि दो-यापासून स्वःताला सोडवावे. जी चमू पहिल्यांदा स्वःताला सोडविल ती विजयी होईल.

**पर्याय**


जी चमू स्वतःसोबत भांडली नाही आणि ज्यांनी स्वतःची सूटका करून घेतली त्यांना तुम्ही बक्षिस देऊ शकता किंवा त्यांच्यासाठी टाळया वाजवू शकता.

कोडयाची उत्तरे – धडा 2

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बं | ळे | से | क्षा | ना | सा | प्रा | गु | गा |
| से | दी | र | व | बं | ख | र्थ | क्षा | ळे |
| क्षा | सु | शा | से | क | ळ | ना | न | बं |
| सि | क्षा | म | ळे | बं | या | वा | से | य |
| बं | ला | से | क्षा | चा | धी | गा | दा | ता |
| गु | बं | स | णे | बं | शि | मु | रं | र |
| ळे | क्षा | गा | से | क्षा | स | पा | बं | ण |
| से | त | पी | ल | क | बं | ळे | ई | क्षा |
| गी | ळे | बं | लो | से | भू | मी | कं | प |





# धडा 3

शिर्षक – धडा 3

जमीनीवर पाय ठेवून उभे राहा

पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 3

स्तेफनाचा मृत्यू
प्रेषित 6:8-15, 7:51-60


चिन्हे – धडा 3

आजचे उपस्थितीचे चिन्ह :
ज्या प्रत्येक विद्यार्थ्याने मागील आठवडयामधील ‘‘बुट कॅम्पमध्ये सांगितलेले काम केले त्यांना ही रिबन मिळेल.




ज्या सर्व विद्यार्थ्यांनी मागील आठवडयातील सांगण्यात आलेले वाचन पूर्ण केले त्यांना तारा मिळल.

जो विद्यार्थी मागील आठवडयातील पाठांतर वचन म्हणून दाखविल त्याला तारा मिळेल.





नाटक – धडा 3

अधिकारी अपराईट आदेश देतात की सैनिक गिगल आणि सैनिक डयुटी दुपारभर उभे राहातील. नंतर अधिकारी अपराईट शिपायांच्या मागे मोठा आवाज करतात. ते उडी मारतात आणि पळून जातात. दुस-या वेळी जेव्हा ते घाबरतात तेव्हा ते एकमेकांच्या अंगावर पडतात. तिस-या वेळेला सैन्याधिकारी मोठा आवाज निर्माण करण्यासाठी भांडयांचा वापर करतात. शेवटी, सैन्याधिकाराच्या आदेशानूसार सैनिक सरळ उभे राहातात.

पाठांतर वचन – धडा 3

"ह्या कारणास्तव तुम्हांला वाईट दिवसांत प्रतिकार करता यावा व सर्वकाही केल्यावर टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री घ्या." इफिसकरांस पत्र 6:13

मुख्य धडा – धडा 3

**प्रेषित 6:8-15, 7:51-60**

आपण देवाच्या शस्त्रसामग्रीचा अभ्यास करीत असतांना, आपण देवाची शस्त्रसामग्री जगत असतांना ती धारण करत असतो. तुम्ही सत्याचा कमरबंद बांधण्यासाठी प्रार्थना करू शकत नाही. तुम्ही तुमच्या मुखाने सत्य सांगता तेव्हा आणि देवाच्या सत्यावर तुमच्या अंतःकरणामध्ये विश्वास ठेवता, तेव्हा तुम्ही सत्याचा कमरबंद घातलेला असतो. तसेच तुम्ही विश्वासाची ढाल उचलण्यासाठी प्रार्थना करू शकत नाही. तुम्ही विश्वसाने जगत असतांना, देव काय म्हणतो त्यावर विश्वास ठेवतांना आणि मनुष्ये काय म्हणतात त्यावर विश्वास ठेवित नाही तेव्हा विश्वासाची ढाल तुमच्या हातात असते आणि तिचा वापर तुम्ही शत्रुपासून बचाव करण्यासाठी करीत असता. हेच तत्व जमिनीवर उभे राहण्यासाठी लागू पडते. जमिनीवर उभे राहण्यासाठी तुम्ही प्रार्थनेतील ठराविक वाक्प्रचार वापरू शकत नाही. तुम्ही देवावर विश्वास ठेवित असतांना आणि हात टेकण्यास नकार देत असतांना तुम्ही तुमच्या भूमिवर स्थिर उभे असता.

प्रेषितांच्या कृत्येमधील, आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीमध्ये, स्तेफन आपल्यासाठी मोठे उदाहरण आहे. तो धार्मिक आणि ज्ञानी मनुष्य होतो ज्याने पूर्णपणे शस्त्रसामग्री धारण केली होती. जेव्हा त्याच्याविरुद्ध धार्मिक विरोध उठला, तेव्हा ज्याच्यावर त्याचा विश्वास होता त्यावर तो स्थिर उभा राहिला, जरी त्याचा परिणाम त्याचे निश्चीत मरण होते तरी.

येशू ख्रिस्ताविषयी प्रवचन केले म्हणून धार्मिक पुढारी त्याच्यावर एवढे क्रोधित झाले होते की त्यांनी गर्दीला हिसांचारासाठी भडकविले आणि शेवटी स्तेफनला दगडमार करून मारून टाकले. या पूर्ण पवित्र शास्त्रातील गोष्टीमध्ये स्तेफन आपल्या विश्वासावर स्थिर उभा राहिला आणि त्याने लोकांच्या मताप्रमाणे आपले मत बदलले नाही. तुम्ही देवावर विश्वास ठेवता आणि त्याच्यासाठी छळ सोसण्यास तयार होता तेव्हा तुम्ही जमिनीवर स्थिर उभे असता आणि देवाची शस्त्रसामग्री धारण करून तुम्ही स्थिर उभे असता.

बुट कॅम्प– धडा 3

**नेमून दिलेले काम– धडा 3**



शाळेमध्ये पवित्र शास्त्र आणा आणि ते आपल्या पाठीवरील पिशवीमध्ये किंवा दुस-या पिशवीमध्ये लपवून ठेवू नका. ज्यावर तुम्ही विश्वास ठेवता त्यासाठी उभे राहा आणि ख्रिस्ती असण्याची लाज बाळगू नका.

**गृहपाठ (मोठी मुले) – धडा 3**

प्रेषित 8-10 वाचा

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 3

‘‘मी स्थिर उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे.’’

प्रश्न आणि उत्तरे – धडा 3

1.मानवी जीवनातील चढ आणि उतार कोणते आहेत?

उदाहरणार्थ: एका सत्रामध्ये एका विद्यार्थ्याला चांगले गूण मिळतात आणि दुस-या विद्यार्थ्याला फार वाईट गूण मिळतात. एखादी व्यक्ती एके दिवशी फार आनंदी आणि दुस-या दिवशी दुःखी असते. एखाद्या व्यक्तीकडे खूप पैसे असतात आणि मग ती व्यक्ती सर्वकाही गमावून बसते. जी व्यक्ती म्हणते की मी फार मजबूत आहे आणि पाप करीत नाही, पण मग लक्षात येते की तो लैंगिक पापात पडलेला आहे.

2.आपण सैतानाविरुद्ध केव्हा उभे राहण्याची गरज आहे?

जेव्हा आपल्याला लबाडी करण्याचा मोह होतो. जेव्हा कोणीतरी आपल्याला गळ घालते की जेथे अल्पवयीनांना प्रवेश नाही तेथे प्रवेश करावा किंवा जेव्हा आपल्याला खूप आवडणारा पेन आपण चोरण्याच्या बेतात असतो. आपण नेहमी स्थिर उभे राहावे कारण आपण सदैव लढत असतो.

3.स्थिर उभे राहण्यासाठी सर्वात महत्वाची कोणती कृति आपण केली पाहिजे?

अशारीतीने जगण्यास शिका की तुम्ही नेहमीच देवाची शस्त्रसामग्री धारण केलेली असावी.

4.खोटे आरोप केलेले असतांना कोणाचा चेहरा देवदूताच्या चेह-यासारखा दिसला?

स्तेफन


5.मरण पावण्यापूर्वी तो काय म्हणाला?

‘‘हे प्रभू, हे पाप त्याकडे मोजू नको.’’ प्रेषित 7:56 आणि प्रेषित 7:59-60.

खेळ : लढाई – धडा 3

**साहित्य**

चेंडू, चिकट टेप



**तयारी**

मैदानावर किंवा एखाद्या जागेवर खेळाडूंना जागा ठरवून द्या.

**खेळ खेळणे**

1.तुमच्या वर्गाला दोन भागात विभागा, जर तूमच्याकडे 20 पेक्षा जास्त विद्यार्थी असतील तर आम्ही सूचवितो की तूम्ही पाळीपाळीने खेळायला लावा, एका चमूमध्ये 8 पेक्षा जास्त खेळाडू नसावेत.

2.जेथे खूणा करण्यात आल्या आहेत तेथे खेळाडू उभे राहातील आणि त्यांच्यामध्ये एका हाताचे अंतर असेल.

3.शिक्षक हळूवारपणे चेंडू फेकतील. एक चमू तो चेंडू दूस-या चमूच्या जाळयात टाकण्याचा प्रयत्न करील आणि दुसरी चमू तो चेंडू दुस-या चमूच्या जाळयात टाकण्याचा प्रयत्न करील.

4.खेळाडू आपली जागा सोडू शकणार नाहीत, केवळ जागा बदलू शकतील, गोल होईपर्यंत ते एका वेळी एक पाय उचलतील.


**पर्याय**

1.तुम्ही आत खोलीमध्ये खेळू शकता आणि रंगीत टेपने खूणा करू शकता.


2.खेळाडू उभे राहील्यापेक्षा खुर्चीवर बसू शकतात.

कोडयाची उत्तरे – धडा 3

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रा | आ | प्र | ना | शू | पा | र्ग | पु | ज्ञ | गे |
| ना | र्थ | त | भू | आ | प | आ | स्व | प्रा | पु |
| आ | शू | ना | र्ग | प्रा | थे | शू | पु | र्ग | ना |
| त | प्रा | आ | के | ब | ना | प्रा | त | रू | ण |
| ना | शू | न | पु | ली | चा | रे | ष | प्रा | आ |
| पु | फ | प्रा | त | शू | णा | व | ना | श | त्र |
| स्ते | पु | ना | र्ग | व | आ | प्रा | क | ह | शू |
| र्ग | प्रा | आ | ला | द | ग | ड | मा | [illegible] | त |
| शू | ना | ष | पु | त | पु | आ | प्रा | त्मा | णे |
| त | दो | आ | प्रा | र्ग | त्र | शू | आ | ना | पु |







# धडा 4

शिर्षक – धडा 4

सत्याचा कमर बंध

पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 4

हनन्या आणि सपीरा
प्रेषित 5:1-10

चिन्हे – धडा 4

आजचे उपस्थितीचे चिन्ह :

ज्या प्रत्येक विद्यार्थ्याने मागील आठवडयामधील ‘‘बुट कॅम्पमध्ये सांगितलेले काम केले त्यांना ही रिबन मिळेल.




ज्या सर्व विद्यार्थ्यांनी मागील आठवडयातील सांगण्यात आलेले वाचन पूर्ण केले त्यांना तारा मिळल.

जो विद्यार्थी मागील आठवडयातील पाठांतर वचन म्हणून दाखविल त्याला तारा मिळेल.






नाटक – धडा 4

गिगल सैनिक त्याच्या बराक मधील डयूटी सैनिकाकडे जे सत्य  नाही त्या बद्दल बढाई मारते, आणि तिचा कमरबंध विसरते. प्रशिक्षणाच्या मिशन वर गिगल सैनिक डयूटी सैनिकाकडून साहित्य उसने मागत राहते. जेव्हा अधिकारी सरळ गिगलला तिच्या कमर बंधाबद्दल विचारतात तेव्हा ती खोटे बोलते. शेवटी गिगल अधिका-याकडे कबूल करते कि ती तो विसरली, डयूटीला खोटं बोलल्या बद्दल क्षमा मागते आणि जाऊन तिचा कमर बंध घेते.

पाठांतर वचन – धडा 4

"तर मग आपली कंबर सत्याने कसा; नीतिमत्त्वाचे उरस्त्राण धारण करा"

इफिसकरांस पत्र 6:14

मुख्य धडा – धडा 4

**प्रेषित 5:1-10**

इफिस 6 मध्ये सांगिलेल्या शस्त्रसामग्री मधील पहिली वस्तू आहे सत्याचा कमर बंध, जे सैनिकाच्या कमरेला बांधतात आणि संपूर्ण शस्त्र सामग्रीला एकत्र ठेवण्यासाठी मदत करते. कमर बंध सैनिकाच्या अंगावर शस्त्रसामग्री धरून ठेवते, तलवार जागेवर ठेवते, आणि अशी गोष्ट आहे जी सैनिक कधीच काढून ठेवणार नाही. खरं तर जर सैनिकाकडे सत्याचा कमर बंध नसला तर कदाचित त्याचे कपडे खाली पडतील, आणि ते सर्वांसमोर संकोचीत होतील!

सत्याचा एक भाग आहे कि जे तोंडावाटे बाहेर येते. आपण असे ख्रिस्ती असलो पाहिजे जे केवळ सत्य बोलतात, देवा बरोबर किंवा आपल्या आईवडीलां बरोबर खोटे न बोलणारे. सत्याच्या कमर बंधाचा दुसरा भाग हा आहे कि आपण देवावर आणि त्याच्या वचनावर विश्वास ठेवण्याची निवड करतो. वास्तिविकता ही आहे कि आपला शत्रू सैतान आहे नेहमी खोटं बोलण्याचा व आपल्याला भूलवून ज्या गोष्टी सत्य नाहीत त्यावर आपण विश्वास ठेवावा असा प्रयत्न करत आहे.

आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीत, हनन्या आणि सपिरा हयांनी ह्या लबाडीवर विश्वास ठेवला कि ते शिष्यांबरोबर प्रामाणिक आहेत कि नाही हे महत्वाचे नाही. त्यांना जेवढे पैसे मिळाले त्या पेक्षा कमी पैश्याला त्यांनी त्यांची जमीन विकली असे त्यांनी सांगितले. त्यांनी शत्रूवर विश्वास ठेवला ज्याने त्यांना असा विचार करायला लावला कि देव त्यांना पाहू शकत नाही किंवा विक्रिचा तपशील त्याला माहित नाही. परंतू देव सर्व काही पाहू शकतो. शिष्य देवाचे प्रतिनिधी होते. त्यांनी शिष्यांबरोबर लबाडी केली म्हणजे देवा बरोबर लबाडी केली. त्यांनी त्यांच्या व्यवहाराचे सत्य लपविले कारण सैतानाने त्यांच्या कानात जी लबाडी हळूच सांगितली त्याच्या वर त्यांनी विश्वास ठेवला. तुम्ही कोणत्या लबाडीवर विश्वास ठेवत आहात जी तुमची शस्त्रासामग्री पाडू शकते. आपण नेहमी सत्य बोलून आणि देवा बद्दल आणि त्याच्या वचनाबद्दलच्या सत्यावर विश्वास ठेवून नेहमी सत्याचा कमरबंध बांधला पाहिजे.

बुट कॅम्प– धडा 4

नेमून दिलेले काम– धडा 4



तुम्ही सांगितलेल्या लबाडीचा विचार करा आणि ती लिहा. जर ती आत्ताची नसली, तुम्ही लहान असतांनाची असली तरी चालेल. आता पहिली लबाडी लपविण्यासाठी त्याच्या नंतर केलेल्या लबाडया लिहा. त्या लबाडीमूळे कोणाला दुःख झाले ते लिहा.

गृहपाठ (मोठी मुले) – धडा 4

प्रेषित 11-13 वाचा

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 4

‘‘मी प्रामाणिकपणे जीवन जगण्याची निवड करतो.’’

प्रश्न आणि उत्तरे – धडा 4

1. जर तुम्ही प्रामाणिक नसले तर तुमच्या सत्याच्या कमर बंधाला काय होते? तुमच्या शस्त्र सामग्रीच्या इतर भागावर त्याचा परिणाम होईल काय?

जेव्हा आपण लबाडी करतो किंवा अप्रामाणिक राहतो तेव्हा सत्याचा कमर बंध आपल्या अंगावर नसतो, आणि असे जगणे आपले संपूर्ण जीवन नाश करू शकते. कमर बंध तुमची पॅन्ट आणि इतर शस्त्र सामग्री धरून ठेवतो. प्रामाणिक पणा शिवाय, लोक आपल्यावर विश्वास ठेवत नाहीत.

2. एखादा विशिष्ट प्रसंग कोणता जेव्हा तुम्ही ‘‘लबाडी’’ करत नाही, परंतू तुम्ही ‘‘प्रामाणिक’’ नाही?

विद्यार्थ्यांना अशा प्रसंगाचा विचार करू द्या. उदाहरणः तुम्ही शाळेत जाता परंतू अभ्यास करत नाही किंवा दिलेले काम करत नाही. तुम्ही तुमच्या आईवडीलांना सांगता कि तुम्ही तुमच्या मित्रांबरोबर होते परंतू हे सांगत नाही कि तुम्ही काय करत होते. किंवा तुम्ही चांगल्या मार्कांनी परिक्षेत पास होता परंतू तुम्ही हे सांगत नाही कि तुम्ही तुमच्या मित्राचे उत्तरं पाहून लिहिले.

3. खोटं बोलण्याचा परिणाम काय आहे?

विश्वास नष्ट होतो. उदाहरणः तुम्ही तुमच्या आईबरोबर खोटं बोलता, ती तुम्हाला पकडते आणि खूप दिवस तुम्ही जे काही सांगता ते खरं आहे हे मानण्यासाठी तुमच्यावर विश्वास ठेवत नाही. आणखी एक परिणाम हा आहे कि तुम्हाला ते खोटं बोलणं लक्षात ठेवावे लागते आणि नेहमी सारखीच ‘‘गोष्ट’’ सांगावी लागते. ते सोपे नाही. एकदा तुम्ही घसरले, तर तुम्ही खोटारडे म्हणून ओळखले जाता.

4. हनन्या आणि सपीरा ह्यांनी पेत्रा बरोबर तीन तासाच्या अंतराने बोलणे केले तरी त्यांनी त्यांच्या जमीनीच्या सौदयाची सारखीच कहानी कशी काय सांगितली?

कहानी ठरविलेली लबाडी होतीः सल्लामसलत. प्रेषित 5:2,9

5. हनन्या आणि सपीराने कोणाला खोटे सांगितले? आज जेव्हा लोक खोटे बोलतात तेव्हा ते कोणा बरोबर खोटे बोलतात?

त्यांना वाटले ते पेत्रा बरोबर खोटे बोलत आहेत, परंतू तो म्हणाला ते देवाबरोबर खोटे बोलले. प्रेषित 5:4

खेळ : लढाई – धडा 4

**साहित्य**

शिट्टी

**खेळ खेळणे**



विद्यार्थी एका ओळीत समोर तोंड करून उभे राहतात. ( शिक्षक व विद्यार्थी ह्यांच्या मध्ये कमीतकमी 12 मिटरचे अंतर सोडून ) शिक्षक दुस-या बाजूला पलटून म्हणतात ‘‘धावा’’. विद्यार्थी शिक्षकाकडे धावतात. शिक्षक म्हणतात ‘‘गारठा’’ आणि मुलांना गारठलेल्या स्थितीत तसेच थांबायचे आहे. ओरडा ‘‘मागे वळा’’ अणि मुलांना वळायचे आहे... मग ‘‘धावा’’ आणि त्यांना दुस-या दिशेने धावयचे आहे. वेगवेगळया गोष्टी ओरडत रहा. ( हळू धावा, उडी मारा इ. ) जेव्हा पहिला विद्यार्थी शिक्षकाकडे पोहचेल तेव्हा तो घोषणा करणारा होईल आणि खेळ पून्हा सुरू होवू शकतो.

**पर्याय**

1. कार्य सांगण्याआधी शिट्टी वाजवा, जेणे करून जे तुम्ही सांगणार आहात ते मुलं ऐकतील. ( म्हणजे तुम्हाला खूप जोरात ओरडावे लागणार नाही )

2. जर तुमच्याकडे ज्यास्त जागा नाही तर मुलं धावण्याऐवजी चालू शकतात.

कोडयाची उत्तरे – धडा 4

तुमच्या जीवनात देवाचे 5 सत्य लिहा.

कल्पना:

देव माझी काळजी घेतो.
देव मला शक्ति देतो.
देव माझा मदतनीस आहे.
देव त्याचे अभिवचनं पूर्ण करतो.
देव माझ्या  जीवनाच्या प्रत्येक क्षणात माझ्या  बरोबर आहे.


| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| षि | त्मा | र्थ्य | ह | पे | ल | से | व | त्मा | पु | स |
| पे | पु | ह | द | शे | त्मा | षि | ह | से | र | र्थ्य |
| मा | ण | से | य | षि | पु | र्थ्य | त्मा | पे | ले | ह |
| त्मा | ह | षि | र्थ्य | से | ह | आ | र्थ्य | पु | त्मा | शे |
| पे | पु | म | त्मा | शे | र्थ्य | ह | शे | से | डी | ह |
| पै | सा | से | ह | पे | त | पु | षि | बा | र्थ्य | त्मा |
| त्मा | पु | त | षि | त्र | र्थ्य | ज | ल | पे | ह | से |
| ह | षि | स | पी | रा | पु | त्मा | मी | र्थ्य | न्या | षि |
| प्रे | र्थ्य | त्मा | ह | त्मा | प | षि | पु | न | पे | शे |
| पु | से | दे | व | ल | त्नी | र्थ्य | ह | त्मा | ह | स |
| त्मा | ह | त्मा | ह | षि | शे | पु | ल | पे | से | र्थ्य |

तुमच्या जीवनात तुम्ही सत्याचा कमर बंध जेव्हा वापरू शकता अशी 5 उदाहरणं लिहा.

कल्पनाः

जेव्हा मित्र चूकीची गोष्ट करत आहे आणि मला त्या बद्दल माहित आहे.
माझ्या  शिक्षकांना सत्य सांगावे.
जेव्हा ते मला विचारतात कि मी परीक्षेत नक्कल केली काय.
गोष्टी बढवून चढवून सांगू नये.
जेव्हा मी चूक करतो, तेव्हा माझा दोष स्वीकारणे.





देव माझी काळजी घेतो.
देव मला शक्ति देतो.
देव माझा मदतनीस आहे.
देव त्याचे अभिवचन पूर्ण करतो.
देव माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षणात माझ्या बरोबर आहे.

जेव्हा मित्र चुकीची गोष्ट करत आहे आणि मला त्या बद्दल माहित आहे.
माझ्या शिक्षकांना सत्य सांगावे.
जेव्हा ते मला विचारतात कि मी परीक्षेत नक्कल केली काय.
गोष्टी बदलून चढवून सांगू नये.
जेव्हा मी चूक करतो, तेव्हा माझा दोष स्वीकारणे.

# धडा 5

शिर्षक – धडा 5

नितीमत्वाचे उरस्त्राण

पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 5

कर्नेल्य


प्रेषित 10:9-23

चिन्हे – धडा 5

आजचे उपस्थितीचे चिन्ह :

ज्या प्रत्येक विद्यार्थ्याने मागील आठवडयामधील ''बुट कॅम्पमध्ये सांगितलेले काम केले त्यांना ही रिबन मिळेल.





ज्या सर्व विद्यार्थ्यांनी मागील आठवडयातील सांगण्यात आलेले वाचन पूर्ण केले त्यांना तारा मिळेल.

जो विद्यार्थी मागील आठवडयातील पाठांतर वचन म्हणून दाखविल त्याला तारा मिळेल.

नाटक – धडा 5

सैनिक गिगल आणि डयूटी ह्यांना आत्ताच दगडं संरक्षक शर्ट मिळाले. सैनिक गिगल सैनिक डयूटी बरोबर खेळ सुरू करतो ज्यात ते ऐकमेकांच्या शर्टावर मारतात. नक्कीच शर्टामूळे लागत नाही. अधिकारी अपराईट त्यांना मऊ ''दगडं'' देतो आणि त्यांना संघात विभागतो. गिगल शर्ट विसरली जेव्हा प्रशिक्षण सुरू होते तेव्हा तिला मऊ दगडं लागत राहतात.

पाठांतर वचन – धडा 5

"तर मग आपली कंबर सत्याने कसा; नीतिमत्त्वाचे उरस्त्राण धारण करा;"

इफिसकरांस पत्र 6:14 ब

मुख्य धडा – धडा 5

**प्रेषित 10:9-23**

इफिस अध्याय 6 मध्ये सांगितलेले देवाच्या शास्त्रातील पुढील शस्त्र नितिमत्वाचे उरस्त्राण आहे. नितिमत्व म्हणजे दैवी चारित्र्य दाखविणे, किंवा जे खरे, चांगले आणि विश्वासू ते करणे. प्रभू समोर जे योग्य ते करत राहण्याची कृती आपले उरस्त्राण जागेवर ठेवते. देव आपल्याला वचनामध्ये सांगतो कि आपण हुशार व्हावे आणि योग्य ती गोष्ट करावी. जेव्हा आपण तसे करतो, तेव्हा आपण खात्री बाळगावी कि आपले उरस्त्राण जागेवर राहिल, आणि जेव्हा आपण लढाईत राहू तेव्हा आपले हृदय सुरक्षित राहतील. उरस्त्राणा बद्दल एक महत्वाची गोष्ट आहे कि ते आपल्या हृदयाला झाकते जो एक महत्वाचा अवयव आहे, परंतू केवळ समोरून. जेव्हा आपण ते घालतो तेव्हा आपण जखमी होवू शकतो परंतू तरी सुध्दा उठून आपण चालतच राहू शकतो. परंतू आपण लढाई समोरून लढावी कारण उरस्त्राण केवळ समोरील बाजू झाकते. जर आपण पलटून माघार घेवून पळालो तर ते आपले संरक्षण करणार नाही. पवित्र चरित्र आणि नितिमत्व काय आहे? आपल्या कडे ते आहे हे आपल्याला कसे कळेल? पवित्र शास्त्र सांगते कि कर्नेल्य समर्पित आणि देवाला भिऊन वागणारा मनुष्य होता जो उदारपणे दान देत होता आणि नियमित प्रार्थना करत असे. पवित्र शास्त्र हे देखील सांगते कि सर्व यहूदी

लोक त्याला मान देत होते. जेव्हा तुम्ही नितिमान आहात तेव्हा इतरांना कळेल कारण वेळे बरोबर ते पाहण्यासाठी स्पष्ट होईल. कर्नेल्यने नितिमत्वाचे उरस्त्राण घातलेले होते. त्यावेळेस, हेल्लेण्यांबरोबर संबंध ठेवणे किंवा त्यांची भेट घेणे सुध्दा यहुदी नियमांच्या विरुद्ध होते. ( प्रेषित 10:28 ) देवाने पेत्राला दर्शन दिले कि त्याने जाऊन कर्नेल्य ला शुभवर्तमान सांगावे. कर्नेल्य देव भिरू माणूस होता म्हणून देवाने त्याचे व त्याच्या संपूर्ण कुटुंबाचे तारण व्हावे म्हणून कोणाला तरी पाठविले. ( नियमांच्या विरुद्ध असूनही) !

बुट कॅम्प– धडा 5

नेमून दिलेले काम– धडा 5



ते कसे जीवन जगतात आणि इतरांशी जसे वागतात त्यामूळे तुम्ही त्यांचा आदर करता अशी तुमच्या परिचयाची व्यक्ति कोण आहे? (आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टी प्रमाणे). त्यांच्या चांगल्या जीवनाचा एक पूरावा द्या आणि मग त्यांच्याकडे जाऊन ते सांगा.

**गृहपाठ (मोठी मुले) – धडा 5**

प्रेषित 14-16 वाचा

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 5

''मी नेहमी योग्य ते करण्याची निवड करतो.''


प्रश्न आणि उत्तरे – धडा 5

1. तुमच्या जीवनाच्या कोणत्या परिस्थितीत तुम्ही हे दाखविले आहे कि तुम्ही नितिमत्वाचे उरस्त्राण घातले आहे आणि केव्हा नाही?
होयः तुम्ही म्हाता-या माणसाला रस्ता ओलांडण्यासाठी मदत केली. तुम्ही नियमितपणे तुमच्या आईला घर स्वच्छ करण्यासाठी मदत करता. तुमच्या लहान भावाबरोबर तुमच्या वस्तू वाटून घेता. नाहीः शाळेत लहान मुलांना त्रास देता. तुमच्या भावाची गंमत करता. तुमच्या वर्गातील मुलाचा परिक्षेत वाईट निकाल होण्याचे कारण बनता.
2. नितिमत्वाचा आव कसा आणला जावू शकतो ते सांगा.
ख-या नावांचा उपयोग न करता, चर्च मध्ये चांगले दिसणा-या कुटुंबाचे वर्णन करा. घरी ते खूप भांडून एकमेकांवर ओरडतात. त्यांनी कोणाला तरी आर्थिक रित्या फसविल्याची ते फुशारकी मारतात. देवाचे नाव व्यर्थ घेण्यासाठी ते वाईट विनोद सांगतात.
3. कोणत्या परिस्थितीत संकोचीत होण्या ऐवजी तुम्ही शांत राहण्याची निवड करता?
जो ज्यास्त प्रसिध्द नाही त्याला गरज असूनही तुम्ही प्रोत्साहन देत नाही. मुलं आजूबाजूला आहेत म्हणून तुम्ही प्रार्थना न करण्याची निवड करता.
4. पेत्र कोणच्या घरी भेटण्यासाठी गेला? हे असामान्य का होते?
देवाने त्याला कर्नेल्यच्या घरी पाठविले. तो यहूदी नव्हता, आणि यहूदी सहसा इतरांबरोबर मिसळत नसत.
5. कर्नेल्य त्याच्या क्षेत्रातील इतर मनुष्यांपेक्षा वेगळा कसा होता?
कर्नेल्य अधिकारी असूनही दयाळू होता. तो त्याच्या कुटुंबाची चांगली काळजी घेत असे. स्थानीक यहूदयांना मदत करून तो देवाचा मान करत होता.

खेळ : बचाव – धडा 5

**साहित्य**

मास्कींग टेप, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी डिस्पोजेबल कप, 1-2 चेंडू



**तयारी**

टेपची रेषा काढून खेळाच्या मैदानाचे दोन भाग करा.

**खेळ खेळणे**


1 तुमच्या वर्गाला दोन गटात विभागा आणि त्यांना रेषेच्या आजू बाजूला ठेवा.
प्रत्येक विद्यार्थ्याला एक कप द्या. आणि ते तो कप त्यांच्या बाजूला कुठे ठेवायचे ते ठरवतील. ( रेषेपासून सहा मिटर पेक्षा दुर नको ). मग विद्यार्थी त्यांचा कप व रेषा ह्यांच्या मधे उभे राहतील.

2. एका गटाला चेंडू दया. त्या गटातील एक व्यक्ति तो चेंडू रेषेच्या दुस-या बाजूला जमीनीला टेकून ढकलेल दुस-या बाजूच्या गटाचे कप पाडण्यासाठी जेव्हा कि दुस-या गटाचे लोक हात व पायाचा उपयोग करून त्यांच्या कपाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करतील. जो विद्यार्थी चेंडू पकडेल तो दुस-या दिशेने तो पाठविल. प्रत्येक वेळेस जेव्हा कप पडेल तेव्हा विद्यार्थी बाद होईल आणि स्वतःचा कप घेऊन बाजूला वाट पाहिल. जर खेळत असतांना कप पडलेच नाही तर आणखी एक चेंडू द्या म्हणजे एका वेळेस दोन चेंडू राहतील. 5 मिनिटांनी खेळ संपवा, आणि विद्यार्थ्यांना पुन्हा सुरवात करू द्या.

**पर्याय**

विद्यार्थ्याच्या संख्ये पेक्षा अधिक कप वापरले जावू शकतात जेणे करून त्यांना सांभाळण्यासाठी अधिक कप राहतील.

कोडयाची उत्तरे – धडा 5



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | र | णे | मा | धि | क | प्रा | दृ | ष्टां | त |
| धि | श | य | ण | भ | त | नें | र | प्रा | भि |
| भ | धि | ता | से | र्ग | मा | णे | ल्य | भ | न |
| य | न | भ | धि | आ | त्मा | र | ना | मो | णे |
| भि | पे | त्र | मा | प | त | य | शि | धि | स्व |
| त | र | णे | प्रा | खा | ती | यो | ग्य | घ | र्ग |
| मा | प्रा | र्थ | ना | णे | धि | भ | न | य | र |

# धडा 6

शिर्षक – धडा 6

शांतीच्या सुवार्तेची चप्पल

पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 6

फिलिप्प आणि हबशी षंढ

प्रेषित 8:26-40

चिन्हे – धडा 6

आजचे उपस्थितीचे चिन्ह :

ज्या प्रत्येक विद्यार्थ्याने मागील आठवडयामधील ‘‘बुट कॅम्पमध्ये सांगितलेले काम केले त्यांना ही रिबन मिळेल.




ज्या सर्व विद्यार्थ्यांनी मागील आठवडयातील सांगण्यात आलेले वाचन पूर्ण केले त्यांना तारा मिळेल.

जो विद्यार्थी मागील आठवडयातील पाठांतर वचन म्हणून दाखविल त्याला तारा मिळेल.




नाटक – धडा 6

आज सैनिक गिगल सर्व गोष्टींसाठी चिंता व कूरकूर करत आहे. सैनिक गिगल तिचे सुरक्षा बुट विसरली आहे आणि तिचे अणवाणी पाय प्रशिक्षणाच्या वेळेस दुखत राहतात, त्यामूळे ती अधिकच कूरकूर करते आणि चिंता करते. अधिकारी अपराईट सैनिक गिगलला आठवण करून देतो कि जनरल येशू त्यांची काळजी करतो आणि कूरकूर करणे सोडून तिने तिचे बूट आणावे असे तिला सांगतो.

पाठांतर वचन – धडा 6

"...शांतीच्या सुवार्तेने लाभलेली सिद्धता पायी चढवा." इफिसकरांस पत्र 6:15

मुख्य धडा – धडा 6

**प्रेषित 8:26-40**

आता आपल्या चप्पला घालण्याची वेळ आहे जेणे करून आपण जाण्यासाठी तयार राहू! ह्याचा अर्थ आहे कि आपण शुभवर्तमान सांगण्यासाठी , किंवा कोणत्याही क्षणी आज्ञा पाळण्यासाठी, किंवा योग्य ती गोष्ट करण्यास जाण्यासाठी तयार आहोत. आपण आपल्या पायात काय घालतो हे आपले स्थैर्य आणि आपली हालचाल ठरवत असते. आपण कोणती चप्पल घालतो ते हे ठरवत असते कि आपण आरामात किती दुर चालू अथवा धावू शकतो. पायातील चूकीच्या चप्पलीची निवड आपल्याला पांगळं करू शकते, हळू करू शकते आणि चालण्याच्या रेषेच्या बाहेर काढू शकते. जो सैनिक अणवाणी आहे तो ख-या त्रासात पडू शकतो. लढाईमध्ये आपण कुठे पाय ठेवतो ह्याची काळजी करणे शेवटची गोष्ट असायला हवी. आपले बूट आपल्याला समोर असलेल्या लढाई कडे पूर्ण लक्ष देत मोकळेपणाने भिती शिवाय चालण्याची मूभा देतात. ख्रिस्ताच्या शरीराला देवाच्या राज्याची सुवार्ता गाजविण्यासाठी पाठविण्यात आले आहे, जी संपूर्ण जगात त्याचा शांतीचा मार्ग पसरवेल. आपल्या पायात आपल्या चप्पला असतांना आपण समोर जाण्यासाठी आणि इतरां पर्यंत सुवार्ता पोहचविण्यासाठी तयार आहोत.

प्रेषितांची कृत्ये ह्या पुस्तकातील फिलिप्पाची गोष्ट अशा व्यक्तिची महान गोष्ट आहे जो सुवार्ता सांगण्यासाठी जाण्यास तयार होता. अचानक देवदूत त्याला उठून जायला सांगतो, आणि त्याला कोणता रस्ता व कोणते शहर हे नेमके सांगतो. जेव्हा तो तिथे पोहचतो तेव्हा देव त्याला विशिष्ट वाहनाकडे जाण्यासाठी सांगतो. फिलिप्प त्या माणसाला विचारतो कि तो जे वाचत आहे ते त्याला समजत आहे काय, त्याला गाडीत येण्याचे आमंत्रण मिळते, आणि पूढे तो सुवार्ता सांगतो. षंढ ख्रिस्ताचा स्वीकार करण्याचा निर्णय घेतो आणि तिथेच बाप्तिस्मा घेण्यासाठी गाडी थांबवितो! फिलिप्पाने त्याला बाप्तिस्मा दिला, परंतू जेव्हा ते पाण्यातून बाहेर आले तेव्हा, फिलिप्प गायाब झाला! देवाच्या आत्म्याने फिलिप्पाला सुवार्ता सांगणे सुरू ठेवण्यासाठी इतर कुठेतरी नेले. सुवार्ता सांगण्यासाठी तयार असलेल्या व्यक्तिची किती ही अद्भूत गोष्ट आहे!

बुट कॅम्प– धडा 6

**नेमून दिलेले काम– धडा 6**

कुणाला तरी सुवार्ता सांगण्यासाठी तयार नसणे कसे वाटते ते शोधण्याची वेळ आहे. सर्व प्रथम चप्पली शिवाय रस्त्यावर धावणे किंवा चालण्याची कल्पना करा. आह! मग तुम्ही एखाद्याने ख्रिस्ती कसे व्हावे हे विचारल्यावर तुम्ही त्याला काय म्हणाल ते लिहा.



**गृहपाठ (मोठी मुले) – धडा 6**

प्रेषित 17-19 वाचा

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 6

‘‘देवाबरोबर चांगले संबंध ठेवण्याची आणि नेहमी त्याची सेवा करण्यासाठी तयार राहण्याची मी निवड करतो.’’

प्रश्न आणि उत्तरे – धडा 6

1. कोणत्या परिस्थितीत तुम्हाला आधी तयारी न करता सुवार्ता सांगावी लागू शकते?
उदाहरणः ट्रेन मध्ये तुमच्या बाजूला बसलेला व्यक्ति पवित्र शास्त्रा विषयी प्रश्न विचारतो. तुमचा मित्र नाराज आहे आणि मरण्याचा विचार करत आहे. शाळेतील तुमचे शिक्षक म्हणतात कि देव अस्तीत्वात नाही.
2. आधी न सांगता तुम्हाला वर्गाचे नेतृत्व करावे लागले तर तुम्ही कोणते विषय शिकवाल?
विद्यार्थ्यांनसाठी विचार करण्यासाठी हा प्रश्न चांगला आहे कि ते पवित्र शास्त्रातील कोणते विषय शिकवू शकतात. संपूर्ण इतिहासात देवाने लोकांचा उपयोग त्यांच्या वयाच्या लोकांशी बोलण्यासाठी केला आहे.
3. भितीच्या सुवार्तेच्या तुलनेत ‘‘शांतीची’’ सुर्वाता काय आहे?
खरं तर, सुवार्ता हे सांगते कि नरकात सतत जळण्यापासून वाचण्याचा एकमेव मार्ग तारण आहे. लोक मरण्यासाठी घाबरतात, आणि त्या भिती मूळे सुवार्ता ऐकण्यासाठी तयार होतात. जर आपण जगण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणून सुवार्ता सांगितली तर त्यासाठीही ते खरे आहे. आपल्या सभोवती काहीही होत असले तरी आपण शांतीचा अनुभव घेवू शकतो. आपण आपल्यासाठी देवाची प्रिती अनुभवू शकतो.
4. षंढाने फिलिप्पाला काय विचारले?
तो वाचत असलेल्या ग्रंथाचा त्याने अर्थ विचारला.
5. जेव्हा षंढाने पाणी पाहिले तेव्हा त्याने काय मागीतले?
बाप्तिस्मा

खेळ : बचाव – धडा 6

**साहित्य**

मास्कींग टेप आणि दोरी



**तयारी**

टेपने दोन सामांतर रेषा काढा, एकमेकांपासून सहा मिटर दूर आणि तीन मिटर रूंद.

**खेळ खेळणे**

इतर मुलं धावत असतांना रेषेच्या मध्ये कोणता विद्यार्थी उभा राहिल ते ठरवा. ज्या कोणाला धावतांना तो हात लाविल ते जागेवर स्थिर होतील आणि डोक्यावर, खांदयावर, गुडघ्यावर आणि पायावर हात ठेवत तसेच राहतील.


धावणा-या मुलांनी स्पर्श होऊन गारठू नये ह्या बद्दल सावध असावे, परंतू जे आधी गारठले आहेत त्यांना वाचविण्यासाठी ते स्पर्श करू शकतात, म्हणजे ते इतरां बरोबर धावू शकतील. जेव्हा ते रेषेजवळ पोहचतील तेव्हा दुस-या रेषेकडे पोहचण्यासाठी त्यांनी संकेताची वाट पाहावी आणि अशा प्रकारे नेमलेला विद्यार्थी बदलून आणि दुसरा स्वयंसेवक ठेवून खेळ पुढे सुरू ठेवावा.

**पर्याय**

प्रत्येक वेळेस रेषेंच्या मध्ये असलेला विद्यार्थी बदलला तर तुम्ही नेमलेल्या विद्यार्थ्याने पूर्ण करण्याच्या सूचनाही बदलू शकता. ह्यातील एक सूचना अशी असू शकते कि तो चुटकी वाजवत राहील किंवा एका जागेवर कदम ताल करत राहिल.

कोडयाची उत्तरे – धडा 6

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| षं | ह | लि | ढ | य | बा | शां | घे | ह |
| ढ | सं | स | ष्टा | आ | रू | ती | प | शी |
| घे | वा | दे | ह | त्मा | ला | श | ब | ढ |
| प्र | सं | मि | श | त | लि | ह | ले | लि |
| शां | ढ | खा | घे | सां | ह | शां | बा | म |
| प | थ | मा | रू | ढ | ग | फि | लि | प |
| र | मि | अ | धि | का | री | णे | खा | बा |
| बा | स्ता | लि | ह | ढ | शां | प | ण | घे |







# धडा 7

## शिर्षक – धडा 7

विश्वासाची ढाल

## पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 7

पौल आणि नौकाभंग


प्रेषित 27:21-37, 28:1

## चिन्हे – धडा 7

आजचे उपस्थितीचे चिन्ह :

ज्या प्रत्येक विद्यार्थ्याने मागील आठवडयामधील ‘‘बुट कॅम्पमध्ये सांगितलेले काम केले त्यांना ही रिबन मिळेल.






ज्या सर्व विद्यार्थ्यांनी मागील आठवडयातील सांगण्यात आलेले वाचन पूर्ण केले त्यांना तारा मिळेल.

जो विद्यार्थी मागील आठवडयातील पाठांतर वचन म्हणून दाखविल त्याला तारा मिळेल.

## नाटक – धडा 7

आज अधिकारी अपराईट सैनिक डयूटी आणि गिगलला नविन ढाल देतात. प्रशिक्षणात ते त्यांच्यावर येणा-या पाण्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी त्या ढालींचा उपयोग करतात. सैनिक डयूटी ढालीचा उपयोग करण्यात अधिकाधिक चांगली होते आणि कार्य पूर्ण करते आणि थोडीच ओली होते. गिगल तिची ढाल विसरली आणि पूर्ण ओली झाली.

## पाठांतर वचन – धडा 7

"आणि ह्या सर्वांबरोबरच जिच्या योगे त्या दुष्टाचे सगळे जळते बाण तुम्हांला विझवता येतील, ती विश्वासाची ढाल हाती घ्या व उभे राहा." –इफिसकरांस पत्र 6:16

## मुख्य धडा – धडा 7

**प्रेषित 27:21-37, 28:1**

आज आपण विश्वासाच्या ढाली बद्दल शिकत आहोत, सुरक्षेसाठी एक चांगले शस्त्र कारण आपण ते हलवू शकतो आणि विशिष्ट हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करू शकतो. पवित्र शास्त्र सांगते कि आपण त्याचा उपयोग दुष्टाचे जळते बाण विझविण्यासाठी करू शकतो. ते असे म्हणत नाही कि ‘‘जर’’ बाण आले तर परंतू ‘‘जेव्हा’’ बाण येतील, तेव्हा आपण त्याच्या विरुद्ध शक्ति हिन राहणार नाही. सत्य हे आहे कि शत्रू सतत आपल्यावर हल्ला करत असतो. तुमचा शत्रू जळत्या बाणांनी तुमचे लक्ष विचलित आणि तुम्हाला आश्चर्यचकित करू इच्छितो. त्याने हे धोरण विशिष्ट रित्या तुमच्यासाठी तयार केले आहे. त्याने तुमच्या सवयी, तुमच्या सर्व सखोल भिती, आणि तुमची कमजोरी ह्यांचा अभ्यास केला आहे, आणि त्याचे बाण विशेष करून त्या विशिष्ट क्षेत्राकडे नेमले आहेत. विश्वास देवावर आणि त्याच्या वचनावर विश्वास ठेवणे आहे, जरी आपण त्याचे आध्यात्मिक राज्य पाहू शकत नसलो तरी. आपण देवाला पाहू शकत नसलो तरी देव आहे हे आपल्याला माहित आहे हे आपल्या मनात विश्वास असणे आहे. आपल्यामध्ये विश्वास असतांना आपण शत्रूचे हे निर्देशित हल्ले पराभूत करू शकतो.

आजच्या प्रेषितांचे कृत्ये पुस्तकातील पवित्र शास्त्रातील गोष्टीत, पौल भयंकर वादळाच्या वेळेस समुद्रात होता, आणि देव त्याला सांगतो कि जहाजावरील कोणीच वादळात मरणार नाही! जरी पौल देवाला पाहू शकत नव्हता तरी त्याने देव जे त्याच्या बरोबर बोलला त्याच्यावर विश्वास ठेवण्याची निवड केली. त्यानंतर देवाने पौलाला जे सांगितले आणि त्यांना शक्तिसाठी भरपूर जेवण करायला लावले हे पाहणे मनोरंजक आहे. पौलाने केवळ देवावर विश्वास ठेवला नाही, तर तो देवाचा संदेश सार्वजनिक रित्या इतरांना सांगण्यसाठी व त्यानुसार करण्यासाठी तयार होता! जर नौकाभंगात कोणी मरण पावले असते तर तो भयंकर रित्या संकोचला असता. कधी कधी आपल्यालाही मनुष्याच्या ऐवजी देवाच्या वचनावर विश्वास ठेवून सार्वजनिक होण्याची गरज आहे. जे तुम्ही पाहू शकत नाही त्याबद्दल शाश्वत होऊन तुम्ही तुमची विश्वासाची ढाल हाती घ्याल का? ह्या प्रकारे तुम्ही शत्रू विरुद्ध जिंकू शकाल आणि त्याचे जळते बाण विझवू शकाल!

बुट कॅम्प– धडा 7

**नेमून दिलेले काम– धडा 7**



ह्या आठवडी तुम्हाला दिसत नसल्या तरी तुम्ही पवित्र शास्त्रातील ज्या गोष्टींवर विश्वास ठेवता त्या लिहा. यादीतील कोणत्या गोष्टीवर शत्रू नेमका हल्ला करील?

**गृहपाठ (मोठी मुले) – धडा 7**

प्रेषित 20-22 वाचा

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 7

‘‘मी देवावर विश्वास ठेवण्याची निवड करतो.’’

प्रश्न आणि उत्तरे – धडा 7

1. वास्तविक जीवनात, ‘‘दुष्टाचे जळते बाण कोणते आहेत?’

उदाहरणः तुमचे शिक्षक सांगतात कि मनुष्य माकडा पासून तयार झाला आणि देवाने सर्व गोष्टी निर्माण केल्या नाहीत. इतर म्हणतात कि येशू केवळ एक चांगला मनुष्य किंवा गुरू होता आणि तो देव नव्हता. तुमची भिती कि देव तुमच्या आईवडीलांचे जीवन बदलू शकत नाही.

2. सर्वसाधारण जीवनात तुम्ही तुमच्या विश्वासाच्या ढालीने बाण कसे हुकवू शकता ह्याचे विशिष्ट उदाहरण काय आहे,

जेव्हा तुम्ही ऐकता कि देवाने जग निर्माण केले नाही, तेव्हा तुम्ही तुमचे पवित्र शास्त्र उघडा आणि उत्पत्ति 1 आणि 2 वाचा, स्वतःला ही आठवण करून देण्यासाठी कि खरंच काय झाले.

3. तुम्ही विश्वासाशिवाय तुमचे घर सोडणार नाही किंवा घराच्या बाहेर निघणार नाही हे निश्चित करण्यासाठी तुम्ही काय करावे?

पवित्र शास्त्र सांगते कि देवाचे वचन ऐकल्याने विश्वास उत्पन्न होतो. आपण सतत देवाचे वचन वाचावे, ऐकावे आणि ते पाठ करावे, अशा प्रकारे आपण नेहमी विश्वासाची ढाल सोबत आणू. आणखी जेव्हा तुम्ही इतर काय बोलतात ह्याच्या ऐवजी देव काय बोलतो ह्यावर विश्वास ठेवण्याची निवड करता तेव्हा तुम्ही विश्वास प्रगट करता.

4. आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टी मध्ये पौल जहाजात बसून कुठे जात होता? जहाजावर किती लोक होते?

( 276) इटलीला. ह्या प्रवासाच्या वेळेस त्याने कोणते शहर आणि बंदरांना भेट दिली हे दाखविण्यासाठी नकाशा दाखवा. ( सिदोन, पतारा, सिन्दीया, लासीया, क्रेत, कौदा, मिलता ).

5. पौलाला कसे कळले कि वादळात जहाजाचे नुकसान होईल आणि इतर कोणीही मरणार नाही?

एक देवदूत त्याच्या कडे आला आणि त्याने त्याला सांगितले. प्रेषित 27:23-25

खेळ : ढाली – धडा 7

**साहित्य**

मास्कींग टेप, खडर्याचा खोका, आणि रंगीत कागद.

**तयारी**

मास्कींग टेप वापरून जमीनीवर दीड मिटरचा चौकोन तयार करा आणि त्याच्या मधात खोका ठेवा.

**खेळ खेळणे**

तुमच्या गटाला चार संघात विभागा आणि वेगवेगळया रंगाचे कागदाचे चेंडू तयार करा. मुलं मोठया चैकोनाच्या बाहेर उभे राहतील आणि कागदाचे चेंडू खोक्यात फेकण्याचा प्रयत्न करतील. प्रत्येक संघ एक प्रतिनिधी निवडेल जो मोठया चैकोनात फिरू शकेल, जो विरुद्ध संघाचे चेंडू अडविण्याचा प्रयत्न करेल. शेवटी खोक्यातील चेंडू रंगानुसार वेगळे करून एक विदयार्थी ते मोजेल. ज्या संघाचे सर्वाधिक चेंडू जमा झाले तो विजेता ठरेल.



कोडयाची उत्तरे – धडा 7

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हा | पौ | व | ना | जी | व | क | णे | प्रो | पौ | क |
| जी | क | ल | वा | च | ला | हा | पौ | त्सा | रा | ना |
| म | व | ना | क | ता | दि | पौ | व | ह | ल | त्र |
| ल्ला | मु | क | ब | चा | व | णे | जी | न | ना | ल |
| ना | पौ | द्र | व | क | ड | र | ल | व | ज | क |
| णे | क | जी | ना | बु | पौ | क | ण | हा | वि | ल |
| पौ | व | क | ज | दि | जी | जी | पौ | ना | धा | दि |
| हा | णे | हा | हा | पौ | दे | व | दू | त | स | व |
| क | ज | पौ | ज | क | पौ | ना | जी | व | ल | व |
| दि | जी | पौ | क | णे | व | हा | दि | क | पौ | ना |



# धडा 8

शिर्षक – धडा 8

तारणाचे शिरस्त्राण

पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 8

शौलाचे परिवर्तन


प्रेषित 9:1-19

चिन्हे – धडा 8

आजचे उपस्थितीचे चिन्ह :



ज्या प्रत्येक विद्यार्थ्याने मागील आठवडयामधील ''बुट कॅम्प'' मध्ये सांगितलेले काम केले त्यांना ही रिबन मिळेल.



ज्या सर्व विद्यार्थ्यांनी मागील आठवडयातील सांगण्यात आलेले वाचन पूर्ण केले त्यांना तारा मिळेल.

जो विद्यार्थी मागील आठवडयातील पाठांतर वचन म्हणून दाखविल त्याला तारा मिळेल.

नाटक – धडा 8

सैनिक गिगल तिचे सर्व सामग्री घालून येते फक्त तिचे शिरस्त्राण सोडून. काळजीने सैनिक डयूटी तिला विचारते कि तेचे शिरस्त्राण कुठे आहे. गिगल म्हणते कि तिच्या इतर सुरक्षा सामग्रीसह ती पूरेशी सुरक्षित आहे तिला शिरस्त्राणाची गरज नाही. प्रशिक्षणाच्या वेळेस, तिच्या डोक्याला इजा होत राहते. आपराईट तिला आठवण करून देतात कि केवळ इतर सामग्री पूरेशी नाही- तिला शिरस्त्राणाचीही आवश्यकता आहे!

पाठांतर वचन – धडा 8

"तारणाचे शिरस्त्राण व आत्म्याची तलवार म्हणजे देवाचे वचन, ही घ्या."

इफिसकरांस पत्र 6:17

मुख्य धडा – धडा 8

**प्रेषित 9:1-19**

आपण तारणाचे शिस्त्राण घालावे हे महत्वाचे आहे कारण जर आपल्या डोक्यावर वार झाला तर ते जीवघेणे होवू शकते. आपले शिरस्त्राण डोक्यावर आहे हे कसे निश्चित करावे? पवित्र शास्त्र स्पष्ट करते कि ख्रिस्ताने वधस्तंभावर पूर्ण केलेल्या कार्यावर आपले तारण आधारित आहे. जेव्हा तो आपल्या पापासाठी मरण पावला तेव्हा, त्याने खंडणी भरली आणि आपले तारण विकत घेतले! आपण चांगले कार्य करून स्वर्गात जाण्याचा मार्ग कमावू शकत नाही, तर केवळ येशू ख्रिस्तावर भरवसा करून आपण तारले जातो. दररोज आपल्या तारणाचे शिरस्त्राण घालण्यासाठी आपल्याला प्रार्थना समारंभ करण्याची गरज नाही. जर आपण आपल्या तारणासाठी प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे तर, आपण आपले शिरस्त्राण घातले आहे!

प्रेषितांची कृत्ये मधील पवित्र शास्त्रातील गोष्टीमध्ये शौलाला देव चमत्कारिक रित्या दिसला, शौल जो ख्रिस्ती लोकांवर हसत असे व त्यांचा छळ करत असे तो नंतर पौल बनला. एक दिवस दिमिष्काच्या रस्त्यावर येशू अचानक शौलाला स्वर्गातील तेजस्वी प्रकाशासह

दिसला आणि शौल अंधळा होऊन जमीनीवर पडला. तीन दिवसानंतर, देवाने एका ख्रिस्ती व्यक्तिला त्याला बरे करून ख्रिस्ताकडे आणण्यासाठी पाठविले. त्या आठवडी शौलाने येशूवर विश्वास ठेवला आणि त्याचे तारण झाले! जर तुम्ही प्रार्थना कराल आणि तुमच्या तारणासाठी प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवाल तर, जसे पौलाने घातले तसे, तुम्ही आज तुमचे तारणाचे शिरस्त्राण घालू शकता. माझ्या बरोबर प्रार्थना करा,''प्रिय येशू, आज मी मान्य करतो कि मी पापी आहे आणि मी चूक केली आहे. मी विश्वास ठेवतो कि तू माझ्या पापासाठी वधस्तंभावर मरण पावला आणि तू खरा आहेस. मी तुला प्रभू व तारणारा म्हणून माझ्या हृदयामध्ये स्वीकारतो. मला स्वीकारल्या बद्दल, माझ्या वर प्रिती केल्याबद्दल आणि तुझया बरोबर मला स्वर्गात सार्वकालिक जीवन दिल्या बद्दल मी तुझे आभार मानतो.''

बुट कॅम्प– धडा 8

**नेमून दिलेले काम– धडा 8**



तुमच्या पवित्र शास्त्राच्या पहिल्या पानावर तुम्ही कुठे व केव्हा तारणासाठी प्रार्थना केली ते लिहा. जर तुम्हाला आठवत नाही तर तुम्ही ते आत्ता करू शकता! एका विशेष ठिकाणी जा ( तुमच्या झोपण्याच्या खोलीत, तुमच्या घराच्या मागे किंवा तुमच्या चर्च मध्ये ) आणि देवाने तुम्हाला क्षमा करावी अशी विनंती करा. येशूने त्याचे जीवन देऊन तुमच्या पापांची किंमत भरली म्हणून त्याचे आभर माना आणि त्याला तुमचा प्रभू व स्वामी होण्याची विनंती करा. त्याला सांगा कि तुम्हाला त्याच्यासाठी जीवन जगायचे आहे. तुमच्या पवित्र शास्त्राच्या सुरवातीच्या पानावर किंवा तुमच्या विद्यार्थी पुस्तिकेच्या पानावर वेळ आणि जागा लिहा.

**गृहपाठ (मोठी मुले) – धडा 8**

प्रेषित 23-25 वाचा

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 8

''मी माझ्या तारणासाठी प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याची निवड करतो.''

प्रश्न आणि उत्तरे – धडा 8

1. तुम्ही तुमच्या तारणा संबंधी शाश्वत असू शकता काय?

प्रत्येक विद्यार्थ्याने ह्या प्रश्नाचे उत्तर दयावे व का ह्याचे कारण दयावे. कल्पना ही आहे कि त्यांनी निश्चीत व्हावे कि जर ते येशूसाठी त्यांचे हृदय उघडतात आणि त्याचा तारणारा म्हणून स्वीकार करतात, तर त्याच्या कडे तारण आहे.

2. तुम्ही तारण गमावू शकता असे तुम्हाला वाटते काय?

अनेक चळवळी आहेत, काहींना वाटते होय, ते त्यांचे तारण गमावू शकतात आणि इतरांना वाटते नाही. विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रतिक्रियेची चर्चा करावी ही कल्पना आहे.

3. शौल त्याच्या घोडयावर बसून दिमिष्काच्या रस्त्यावर जात असतांना काय झाले?

स्वर्गातून एक तेजस्वी प्रकाश आला आणि तो जमीनीवर अंधळा होऊन पडला. देव त्याच्या बरोबर प्रत्यक्ष बोलला. ( प्रेषित 9 )

4. देवाने दिमिष्काच्या हनन्याला काय सांगितले?

देवाने त्याला सांगितले कि जाउन शौलासाठी प्रार्थना कर. त्याने शौलाला बरे होण्याची गरज आहे हे सांगितले आणि तो जिथे राहत आहे ते घर कसे शोधायचे ते ही सांगितले.

5. हनन्याने देवाला काय सांगितल? जर आपण देवाकडे तक्रार करतो तर काय होते?

हनन्या म्हणाला, ''शौलाने ख्रिस्ती लोकांना किती त्रास दिला ते मी ऐकले आहे. ह्या शहरात सुध्दा आपल्याला तुरूंगात टाकण्याचा अधिकार त्याच्या जवळ आहे.'' देवाने हनन्या संबंधी धीर ठेवला.

खेळ : व्यूहरचना – धडा 8

**खेळ खेळणे**




एका विद्यार्थ्याला उद्घोषक ठरवा. खेळ सुरू करण्यासाठी मुलं खोलीत चालतात. जेव्हा उद्घोषक म्हणतो, ‘‘तारण आहे!’’ तेव्हा विद्यार्थी चालणे थांबवितात, ते जागेवर गोल फिरतात, आणि जितक्या लवकर होईल तितक्या लवकर खाली बसतात. जो सर्वात आधी खाली बसेल तो विद्यार्थी येशू ख्रिस्ता बद्दल काहीतरी बोलेल आणि मग उद्घोषक होण्याची त्याची पाळी होईल. (जर जिंकणारा विद्यार्थी आधीच उद्घोषक झालेला असेल तर त्याला दुसरा विद्यार्थी निवडू द्या जो अजून जिंकला नाही)

**पर्याय**

1. प्रत्येक वेळेस जेव्हा तुम्ही खेळाल तेव्हा, विद्यार्थीना दिलेले निर्देश बदला. ( उदा. दोनदा गोल फिरत असतांना तुमच्या डोक्यावर हात ठेवा आणि खाली बसा, एका पायावर दोनदा उडी मारून, सर्वात जवळच्या भिंतीकडे धावा, इ. )
2. जर कोणता मुलगा जिंकला हे पाहणे कठिण झाले तर, इतर माहिती वापरून दुसरा उद्घोषक निवडता येईल- निळे कपडे घातलेला विद्यार्थी, सर्वात लहान विद्यार्थी, ज्या विद्यार्थ्याचे आडनाव सर्वात मोठे आहे तो, इ.
3. उद्घोषक ओरडू शकतो, ‘‘तारण आहे’’ त्या बरोबर ताळया बाजवू शकतो किंवा शिट्टी वाजवेल, किंवा तुम्ही संगीत वापरू शकता आणि ते थांबवा.

कोडयाची उत्तरे – धडा 8



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शू | ष्य | डो | ल | या | ळे | न | श | क |
| क | नि | ळे | न | ज | ल | ष्य | क्ति | ळा |
| न | त | व | ष्य | क | शू | र | ध | आ |
| हा | ष्य | ल | ड | न्या | क | अं | ळे | श |
| आ | त्मा | शू | न | ले | ष्य | र | शि | ष्य |
| ळे | दि | ह | क | न | ले | ल | क | शू |
| ष्य | मि | क | स्व | र्ग | र | ता | ष्य | न |
| शू | ष्क | ये | ल | ळे | शौ | क | र | व |
| न | ळे | ष्य | शू | र | ल | आ | क | ण |

# धडा 9

शिर्षक – धडा 9

आत्म्याची तलवार

पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 9


पेत्र लोकसमुदायाशी बोलतो

प्रेषित 2:12-17, 22-30, 34-41

चिन्हे – धडा 9


आजचे उपस्थितीचे चिन्ह :

ज्या प्रत्येक विद्यार्थ्याने मागील आठवडयामधील ‘‘बुट कॅम्प"मध्ये सांगितलेले काम केले त्यांना ही रिबन मिळेल.




ज्या सर्व विद्यार्थ्यांनी मागील आठवडयातील सांगण्यात आलेले वाचन पूर्ण केले त्यांना तारा मिळेल.

जो विद्यार्थी मागील आठवडयातील पाठांतर वचन म्हणून दाखविल त्याला तारा मिळेल.



नाटक – धडा 9

डयूटी गिगलला काही वयैक्तिक संघर्ष सांगते, जी तिला काही सल्ला देते. डयूटी गिगलला विचारते कि तिला ही कल्पना कुठुन आली. गिगल तिचा मोबाइल बाहेर काढत म्हणते ती सोशल मिडियावरून तिला मिळाली. तेव्हा अधिकारी अपराईट आत येतात आणि त्यांना सावधान मध्ये करतात आणि सांगतात कि त्यांनी सोशल मिडियावर नव्हे तर पवित्र शास्त्रावर अवलंबून राहावे. सैनिक डयूटी आणि गिगल पवित्र शास्त्र वाचण्याची सुरवात करतात आणि त्यातून प्रत्येकीला तलवार प्राप्त होते!

पाठांतर वचन – धडा 9

"तारणाचे शिरस्त्राण व आत्म्याची तलवार म्हणजे देवाचे वचन, ही घ्या." इफिसकरांस पत्र 6:17 ब

मुख्य धडा – धडा 9

**प्रेषित 2:12-17, 22-30, 34-41**

आत्म्याची तलवार ही शस्त्रसामग्रीतील पहिली वस्तू आहे जी बचावाच्या ऐवजी शस्त्र आहे. ह्याचा अर्थ हा आहे कि आपण त्याच्यासह शत्रूवर हल्ला करू शकतो. ‘‘वचनाची तलवार’’ पवित्र शास्त्र, किंवा देवाचे वचन आहे. लढाईत तलवारीचा उपयोग करण्यासाठी तुम्हाला वचन माहित असायला हवे. ह्याचा अर्थ हा कि तुम्ही पुन्हा पुन्हा तुमचे संपूर्ण शास्त्र वाचत राहावे आणि पवित्र शास्त्रातील वचनं पाठ सुध्दा करावी. आजच्या प्रेषितांचे कृत्ये ह्या पुस्तकातील सत्य घटनेत पेत्र लोकसमुदायाला संदेश देत असतांना वचनांचा उपयोग करतो. असे लोक होते जे देवावर विश्वास ठेवत नव्हते आणि त्याची थट्टा उडवू लागले. जे थट्टा करत होते त्यांच्याशी बोलण्यासाठी पेत्र उभा राहिला आणि त्याने केवळ त्यांना संदेश दिला नाही तर लढाई लढण्यासाठी त्याने वचनांचा उपयोग केला. जेव्हा आपल्याला वचनं पाठ असतात, तेव्हा आपण जेव्हा गरज आहे तेव्हा त्याचा उपयोग करू शकतो. त्या दिवशी पेत्राच्या संदेशा मूळे तीन हजार लोकांचे तारण झाले आणि त्यांनी मंडळीत प्रवेश केला. किती मोठा आर्शिवाद! पेत्राने त्याच्या तलवारीचा उपयोग कौशल्याने केला कारण त्याच्या विशिष्ट प्रसंगासाठी त्याने परिपूर्ण वचन पाठ केलेले होते. त्याने कौशल्याने शत्रू बरोबर लढाई केली

आणि प्रभूसाठी 3000 लोकांना जिंकले! जितके ज्यास्त वचनं तुम्हाला माहित असले तितके ज्यास्त तुम्ही तलवार चालवाल. जेव्हा आपण वचन वाचले आणि ते पाठ केलेले असेल, तेव्हा आपल्याला पाहिजे तेव्हा देव ते आपल्या मनात आणू शकतो. तुम्ही तलावरीच्या बाबतीत कसे आहात?

बुट कॅम्प– धडा 9

**नेमून दिलेले काम– धडा 9**



जी लढाई तुम्ही नियमित लढत आहात त्याला लागू होणारे वचन पाठ करा आणि पुढच्या आठवडी तुमच्या शिक्षकांना सांगा. तुम्ही तुमचे दिसणे, मालकीच्या वस्तू, अधिक हवे असणे, आध्यात्मिक सुरक्षितता आणि तुमचे भविष्य ह्या बद्दल भयभीत असाल.

**गृहपाठ (मोठी मुले) – धडा 9**

प्रेषित 26-28 वाचा

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 9

''मी देवाचे वचन पाठ करणे व त्याचा माझ्या दैनंदिन जीवनात उपयोग करण्याचा निर्णय घेतो.''

प्रश्न आणि उत्तरे – धडा 9

1. तुम्ही शत्रूच्या विरुद्ध हल्लात्मक केव्हा असू शकता?

इतरांच्या तारणासाठी प्रार्थना करतांना, पवित्र शास्त्रातील अभिवचनं घोषित करतांना, देवाची स्तुति करतांना इ.

2. ख-या जीवनात तलवारीने वार करणे ह्याचे उदाहरण कोणते आहे?

उदा. तुम्ही सैतानाकडून लबाडी ऐकता ( कोणी तरी तुम्हाला सांगते कि तुम्ही कुरूप् आहात ) आणि लगेच तुम्ही पवित्र शास्त्रातील वचनाचा विचार करता जे म्हणते तुम्ही देवासाठी विशेष आहात आणि त्याची निर्मीती आहात.

3. आत्म्याच्या तलवारीचा दुरउपयोग कसा केला जातो?

जेव्हा ख्रिस्ती लोक हे विसरतात कि खात्री करून देणे हे पवित्र आत्म्याचे कार्य आहे, आणि ते इतर ख्रिस्ती लोकांवर हल्ला करण्यासाठी वचनाचा उपयोग करतात तेव्हा. जेव्हा पवित्र आत्मा पापाची खात्री किंवा जाणीव करून देतो, तेव्हा तो शक्ती आणि सामर्थ्य देतो आणि त्याला संतोष देण्यासाठी जीवन जगण्यास मदत करतो.

4. पेत्र यरूशलेम मध्ये पन्नासाव्या दिवशी जे बोलला त्यामूळे किती लोक ख्रिस्ती झाले?

सुमारे 3,000

5. नविन ख्रिस्ती लोक ख्रिस्ताचे अनुसरण करणार आहेत हे दाखविण्यासाठी त्यांनी काय केले?


त्यांचा बाप्तिस्मा झाला.

खेळ : संकेत – धडा 9

**साहित्य**

कोरडा बर्फ/ थर्माकोलचा तुकडा, डिस्पाजेबल प्लेट.

**खेळ खेळणे**




''तुम्हाला काय वाटते कि थर्माकोलच्या तुकडयाला हातांचा उपयोग न करता खोलीच्या दुस-या बाजूला कसे नेता येईल. दररोज आपण काही करण्याचा किंवा बोलण्याचा उत्तम मार्ग कोणता ह्याचा निर्णय घेत असतो. ह्या निर्णयांबद्दल आपल्याला मदत करण्याचे अभिवचन देव आपल्याला देत असतो- आपल्याला मदत करतील असे वचनं पाठ करणे व त्याचा उपयोग करण्यासाठी.

1. हातांचा उपयोग न करता थर्माकोलचा तुकडा खोलीच्या एका बाजू पासून दुस-या बाजूला कसा नेता येतो ते दाखवा (किंवा मदतनीसाला दाखवायला लावा) केवळ ताटाचा पंख्यासारखा उपयोग करून. ( लहान पटपट हालचाल करून किंवा मोठयाने हलवून

2. विद्यार्थ्यांना गटात विभागा 6 पेक्षा ज्यास्त नको. खेळण्याच्या जागेवर गटाला ओळीत उभं करा. ओळीतील पहिल्या मुलाला ताट व थर्माकोलचा तुकडा द्या.

3. जेव्हा शिक्षक सांगतील तेव्हा, पहिले मुलं तुकडा हातांचा उपयोग न करता खोलीच्या दुस-या बाजूला नेतील. जेव्हा ते दुस-या बाजूच्या भिंती कडे पोहचतील तेव्हा ते हाताने तुकडा उचलतील, आणि ते पुढच्या विद्यार्थ्याला ताट देण्यासाठी परत धावतील.

कोडयाची उत्तरे – धडा 9



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पु | त्थि | ह | द | ग | हू | दी | नं | रू |
| सा | जी | रू | त्का | रू | श | त्थि | पु | नि |
| नि | नं | त्र | रू | श | पु | र | शा | त्थि |
| ध्य | दे | पु | त्थि | ले | त्का | आ | रू | श |
| त्थि | जी | व | न | म | नि | नं | त्मा | त्र |
| पु | त्र | रू | च | रू | जी | द | त्का | नं |
| पे | त्थि | व | जी | नि | त्थि | पु | जी | ध्य |
| रू | दे | नं | पु | श | त्का | त | त्थि | नि |

# धडा 10

शिर्षक – धडा 10

निरंतर प्रार्थना करा

पवित्र शास्त्रातील गोष्ट – धडा 10

पेत्र तुरूंगातून सुटतो

प्रेषित 12:1-19

चिन्हे – धडा 10

आजचे उपस्थितीचे चिन्ह :



ज्या प्रत्येक विद्यार्थ्याने मागील आठवडयामधील ''बुट कॅम्प'' मध्ये सांगितलेले काम केले त्यांना ही रिबन मिळेल.



ज्या सर्व विद्यार्थ्यांनी मागील आठवडयातील सांगण्यात आलेले वाचन पूर्ण केले त्यांना तारा मिळेल.

जो विद्यार्थी मागील आठवडयातील पाठांतर वचन म्हणून दाखविल त्याला तारा मिळेल.

हा शेवटचा आठवडा आहे, प्रत्येक विद्यार्थी गृहपाठाची 10 वी रिबीन गृहपाठ करून आणि प्रार्थन करून आज मिळवू शकतो. जर त्यांनी वाचनाचे 9 गृहपाठ पूर्ण केले असतील तर ते वचनाचा 10 वा तारा प्राप्त करतील. जर ते सर्व पाठांतर वचनं क्रमाने पाठ बोलू शकतील आजच्या वचना सह तर ते पाठांतरचा 10 वा तारा प्राप्त करतील.



नाटक – धडा 10

अधिकारी अपराईट सैनिक गिगल आणि डयूटीला वाकी टाकी देतात. प्रगत प्रशिक्षणाच्या मधात गिगल आणि डयूटी छिद्रात अडकतात. डयूटी सल्ला देते कि मदतीसाठी वाकी टाकीचा उपयोग करावा. गिगल आधी नाकारते, असा दावा करून की ती स्वतः ते करू शकते. काही वेळा नंतर ते वाकी टाकी काढतात आणि देवाला मदत मागतात. अधिकारी अपराइट अचानक मंचावर येतात आणि शत्रूला हाकलून टाकतात.

पाठांतर वचन – धडा 10

"सर्व प्रकारची प्रार्थना व विनवणी करा, सर्व प्रसंगी आत्म्याच्या प्रेरणेने प्रार्थना करा, आणि ह्या कामी पूर्ण तत्परतेने व सर्व पवित्र जनांसाठी विनवणी करत जागृत राहा." इफिसकरांस पत्र 6:18

मुख्य धडा – धडा 10

**प्रेषित 12:1-19**

शत्रूवर हल्ला करण्यासाठी आपण वापरू शकतो असे दुसरे शस्त्र प्रार्थना आहे. आणि त्याचा उपयोग संरक्षणासाठीही करता येतो. प्रार्थनेने आपण लढाया जिंकू शकतो, आणि पुढे कसे जावे यासाठी प्रभू कडून ज्ञान मिळवू शकतो, आपल्यासाठी लढण्यासाठी स्वर्गीय देवदूत मोकळे करू शकतो, आणि आपण कशा विरुद्ध आहोत हे अधिक चांगल्या रित्या समजू शकतो. आजच्या पवित्र शास्त्रातील

गोष्टीत, आपण पाहतो कि पेत्र तुरूंगात आहे आणि सर्व मंडळी त्याच्यासाठी प्रार्थना करत आहे. ते प्रार्थना करत असतांना देवाने पेत्राला सोडविण्यासाठी तुरूंगात एक देवदूत पाठविला ! देवदूत त्याला तुरूंगातून रस्त्यावर बाहेर आणतो आणि पेत्र घरी परततो जिथे ख्रिस्तात त्याचे बंधू व भगिनी प्रार्थना करत आहेत. त्यांनी त्याच्यासाठी दार सुध्दा उघडले नाही कारण ते विश्वास ठेवू शकले नाही कि तो खरंच पेत्र आहे. ते त्याच्या सुटकेसाठी प्रार्थना करत होते, परंतू जे घडले ते पाहून आश्चर्यचकित झाले! अनेक वेळेस तुम्ही आणि मी प्रार्थना करतो, परंतू जेव्हा देव आपल्या प्रार्थनेचे उत्तर देतो आणि आपली मदत करण्यासाठी येतो तेव्हा आपण आश्चर्यचकित होतो. तो आपल्याला प्रार्थना करायला सांगतो आणि मदत करण्यासाठी अभिवचन देतो. हे शस्त्र सामग्रीतील एक वस्तू आहे जी तुम्ही रोज केली पाहिजे, जर तुम्हाला त्याचा दररोज उपयोग करायचा असेल तर. प्रार्थना गोष्टी बदलते! तुमच्या लढाईसाठी सतत प्रार्थना करा कारण आज आपल्याला आधी पेक्षाही ज्यास्त त्याची गरज आहे.

बुट कॅम्प– धडा 10

नेमून दिलेले काम– धडा 10



सवयी वास्तविक होण्यासाठी दररोज 21 वेळेस पुनावृत्तीत करण्याची गरज असते. जेव्हा तुम्ही बिछान्यावर जाता तेव्हा रोज रात्री प्रार्थना करणे सुरू करा. ती लहान छोटी प्रार्थना असली तरी ठिक आहे, परंतू एक दिवसही चुकविणे योग्य नाही. जर तुम्ही दिवस चुकविला तर, दुस-या दिवशी सकाळी रोज पेक्षा दुप्पट वेळ प्रार्थना करा. तुमच्या बिछान्याला प्रार्थनेच्या जागेत बदला. जेव्हा तुम्ही प्रार्थनेचे 21 दिवस पूर्ण कराल तेव्हा स्वतःला बक्षीस द्या.

**गृहपाठ (मोठी मुले) – धडा 10**

ह्या आठवडी वाचन गृहपाठ नाही.

पावर पॉईंट/ निर्णय – धडा 10

''मी नेहमी प्रार्थना करणे, आणि लढाई आत्मिक आहे हे लक्षात ठेवण्याची निवड करतो.''

प्रश्न आणि उत्तरे – धडा 10

1. ''देवाच्या शस्त्र सामग्री'' मध्ये प्रार्थना का समाविष्ट आहे?

प्रार्थना तुम्हाला आणि तुमच्या मित्रांना सशक्त करू शकते, आणि प्रार्थना देवाचे आणि तुमच्या शत्रूचे मन बदलू शकते.

2. शत्रूच्या विरुद्ध बचाव करण्यासाठी प्रार्थना करण्याचे उदाहरण कोणते आहे अणि शत्रूवर हल्ला करण्यासाठी प्रार्थना करण्याचे उदाहरण कोणते आहे?

बचावः धैर्यवान होण्यासाठी किंवा इतरांना मदत करण्यासाठी प्रार्थना करणे. आणि हे ओळखणे कि तुमच्या विरुद्ध लबाडी किंवा तुमचा अपमान हा आत्मिक शक्तिंकडून आहे. येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये त्यांचा नाकार करून विरोध करा.

हल्लाः इतरांच्या तारणासाठी प्रार्थना करणे, शहराने ख्रिस्ताला पहावे आणि त्याला ओळखावे म्हणून प्रार्थना करणे, किंवा तुमच्या क्षेत्रातील एखाद्या मूर्ती किंवा देवा विरुद्ध प्रार्थना करणे.

3. जर सर्व गोष्टी देवाच्या ताब्यात आहेत तर तो आपल्याला त्याच्याकडे प्रार्थना करण्यासाठी का सांगतो, जेव्हा कि त्याला तुमच्या सभोवती काय आहे हे माहित आहे?

कारण जे होणार ते तुम्हाला समजावे म्हणून. तुमच्या जीवनात आणि तुमच्या आजूबाजूच्या लोकांच्या जीवनात प्रार्थना बदल घडवून आणते.

4. हल्ला करण्यासाठी कोणते दोन शस्त्र आपण वापरावयाचे आहेत?

प्रार्थना आणि आत्म्याची तलवार, जे देवाचे वचन आहे.

5. जेव्हा पेत्राने मरियेच्या घराचे दार ठोठावले तेव्हा दारावर कोण आले?

रूदा, एक दासी.

खेळ : छुपे युध्द – धडा 10

**प्रस्तावना**



आपण प्रार्थनेचा उपयोग हल्ला करण्यासाठी आणि बचावासाठी करतो. आणि ह्या खेळात आपल्याला कागदं जमा करण्यासाठी पुढे जायचे आहे, आणि त्याच वेळेस आपल्या पाठीची काळजी घ्यायची आहे.

**साहित्य**

कागद ( लेटरच्या मापाचा कागद 4 भागात कापलेला - तुमच्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक )

टेप

खेळ खेळणे

1. प्रत्येक विद्यार्थ्याच्या पाठीवर एक कागदाचा तुकडा लावा.
2. शिक्षक सांगतील तेव्हा विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या पाठीवरचा कागद काढण्याचा प्रयत्न करतील. विद्यार्थी स्वतःचा कागद वाचविण्यासाठी स्वतःच्या कागदाला हात लावू शकत नाहीत. परंतू त्यांनी काळजी घ्यावी कि इतर लोक त्यांचा लहान कागद चोरणार नाही.
3. जेव्हा कोणीतरी विद्यार्थ्याचा कागद घेईल तेव्हा, त्या विद्यार्थ्याला त्याने जमा केलेले सर्व कागदं त्या विद्यार्थ्याला दयावे लागतील, आणि त्याला पुन्हा भिंती कडे जाऊन नव्याने सुरवात करावी लागेल.
4. जो पर्यंत सर्व कागदासह एक विद्यार्थी मध्ये राहत नाही तो पर्यंत चालू ठेवा. पुन्हा कागदं वाटा आणि खेळा.

**पर्याय**

कागद आणि टेपच्या ऐवजी, तुम्ही लांब आणि रूंद कापड वापरू शकता आणि विद्यार्थी ते त्यांच्या कमरेला खोचतील.

कोडयाची उत्तरे – धडा 10

खाली कल्पना आहे. विविध उत्तरं स्वीकारा.

प्रार्थना कराः कुटुंब, अन्न, मंडळी, आजार, ज्ञान.

प्रार्थनेचे उदाहरणः देव पित्या माझ्या कुटुंबासाठी आणखी एक जीवनाचा दिवस दिल्या बद्दल आभार मानतो. माझ्या वडीलांची मदत कर. आमेन. (विविध उत्तरं स्वीकारा)

ज्या गोष्टी प्रार्थना करणे कठिण करतात त्याः झोप येणे, मित्रांबरोबर व्यस्त असणे, उशीरा उठणे, गृहपाठ व काम करावेच लागणे.

ज्या गोष्टींसाठी तुम्ही प्रार्थना करू शकता त्या शोधा. फुग्यात प्रार्थना लिहा.




| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| र्थ | त्र | ळ | दी | हे | र्थ | र | प्रा | वा | ई |
| प्रा | र्थ | ह् | र | त्र | गो | र्थ | तु | रू | ग |
| शि | य | ह् | दा | प्रा | ई | व | ळ | र्थ | ह् |
| पा | र्थ | सा | त्र | श | ह | र | प्रा | रा | ळ |
| ई | प्रा | वा | ख | प्रा | र्थ | वा | र्थ | त्र | जा |
| र्थ | दू | शां | त | ळ | दी | जा | पे | र्थ | प्रा |
| त्र | दे | दू | र | र्थ | या | प्रा | शि | ळी | ई |
| वा | व | ख | प्रा | र्थ | ना | र्थ | ड | त्र | वा |
| दे | प्रा | र्थ | वा | र | ळ | मं | र्थ | पे | त्र |



# माझा वर्ग तक्ता

| चिन्हे आणि वैशिष्ट्ये | धडा 1 | धडा 2 | धडा 3 | धडा 4 | धडा 5 | धडा 6 | धडा 7 | धडा 8 | धडा 9 | धडा 10 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |
| विद्यार्थी: | | | | | | | | | | | हजेरी |
| | | | | | | | | | | | वाचन |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | पाठांतर |
| | | | | | | | | | | | गृहपाठ |

जर तुमच्या कडे 10 पेक्षा अधिक विद्यार्थी असतील तर ह्या पानाच्या प्रती काढा.